**काबरा एक्सप्रेस**
डेली A/C बस / अर्जंट पार्सल सर्व्हिस • फुल लोड / पार्ट लोड सर्व्हिस उपलब्ध
गुजरात: अहमदाबाद, सुरत, अंकलेश्वर, राजकोट, बडौदा, किम, आनंद, नवसारी, वलसाड, वापी, भरुच, जामनगर
मध्यप्रदेश: इंदौर, (राज महौल्ला, तीन इमली) उज्जैन
महाराष्ट्र: मुंबई, (वसई, बोरीवली, अंधेरी, भिवंडी, वाशी) औरंगाबाद, नाशिक, पुणे
राजस्थान: उदयपुर, अजमेर, जयपुर | दिल्ली: मोरी गेट
साऊथ: बंगलोर, हैद्राबाद, गोवा
अहमदनगर: नेवासकर पेट्रोल पंपासमोर, मार्केटयार्ड चौक, स्टेशन रोड 7972872112





# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०८.०१.२०२५ | अंक नं. २६१ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020






प्रशस्त दालन | प्रशस्त वाहनतळ | होलसेल विभाग | विनम्र सेवा
**बस्ता बांधायला यायचं हं!**
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
**राजपाल**™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# अतिक्रमण हटवण्यास गेलेल्या महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यास शिवीगाळ व धक्काबुक्की

## सावेडी उपनगरातील प्रकार, प्रकरण आपसात मिटविण्यासाठी अनेकांची 'मध्यस्थी'

नगर – अतिक्रमण हटवण्यासाठी गेलेल्या महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करून शिवीगाळ करण्यात आल्याचा प्रकार ७ जानेवारी रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास सावेडी उपनगरात घडला. याबाबत तक्रार देण्यासाठी अधिकारी, कर्मचारी पोलिस ठाण्यात गेले, मात्र प्रकरण आपसात मिटविण्यासाठी बरीच फोनाफोनी झाल्याने रात्री याबाबत गुन्हाच दाखल झाला नसल्याची माहिती समजली.

महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार शहरासह उपनगरी भागात अतिक्रमण हटाव मोहीम महापालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन विभागासह सर्वच प्रभाग समिती कार्यालयांकडून सुरु आहे. अतिक्रमण निर्मुलन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे एक पथक सावेडी उपनगरात मॅक्केअर हॉस्पिटलजवळ असलेले एक अतिक्रमण काढण्यासाठी मंगळवारी दुपारी ४.३० च्या सुमारास गेले असता त्या अतिक्रमणधारकाने ते काढण्यास विरोध केला. अधिकारी, कर्मचाऱ्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. एकएकाला बघून घेण्याची धमकी दिली.

हा सर्व प्रकार त्या पथकातील अधिकाऱ्याने वरिष्ठांना सांगितला. वरिष्ठांनी त्यांना तक्रार देण्यासाठी पोलिस स्टेशनमध्ये जाण्याच्या सूचना दिल्या. कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांना हा प्रकार समजल्यानंतर त्यांनीही तोफखाना पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिस ठाण्यात सुरुवातीला पोलिसांनी महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनाच सुनावले. तुम्ही पोलिस बंदोबस्त न घेता मोहीम का राबविता? असा सवाल केला.

पोलिस ठाण्यात ही चर्चा सुरु असताना सदर प्रकरण आपसात मिटवून घेण्यासाठी काहींनी मध्यस्थी सुरु केली. या फोनाफोनीत आणि चर्चेच्या गुऱ्हाळात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नाही. सकाळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी पोलिसांना विचारले असता त्यांचे आपसात मिटले असल्याचे सांगण्यात आले.

अतिक्रमणधारकांची वाढती मुजोरी, दादागिरी याला आळा घालण्यासाठी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, असे मत कामगार युनियनच्या काही पदाधिकाऱ्यांनी बुधवारी महापालिकेत चर्चा करताना मांडले. मात्र आता ज्या अधिकाऱ्याला शिवीगाळ, धक्काबुक्की झाली, तो अधिकारी दबावाखाली आल्याने फिर्याद देण्यास नकार देवू लागला. दुपारी उशिरापर्यंत महापालिकेत चर्चेचे गुऱ्हाळ सुरु होते, मात्र पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी कोणी गेले नाही, त्यामुळे गुन्हा दाखल झाला नसल्याची माहिती समजली.

### मनपा अधिकाऱ्यांची ही अवस्था तर सर्वसामान्यांचे काय?

अतिक्रमण, ताबेमारी हे प्रकार अहिल्यानगर शहरात दिवसेंदिवस वाढत आहेत. अतिक्रमण करणाऱ्यांची दादागिरी ही वाढत आहे. ते जर महापालिकेच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, दमबाजी करत असतील तर सर्वसामान्य नागरिकांचे काय? असा सवाल उपस्थित होत आहे. ताबेमारी, अतिक्रमणे करणाऱ्यांची मुजोरी मोडीत काढण्यासाठी महापालिका आणि पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे.

# हातचलाखी करून वृद्धाची हजारो रुपयांची फसवणूक

## कायनेटिक चौक येथील घटना, दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल; आरोपी फरार

नगर – वृध्द इसमास दोन अनोळखी इसमांनी पत्ता विचारण्याच्या बहाण्याने भुरळ पाडून सोन्याची अंगठी व पैसे दुप्पट करून देतो असे आमिष दाखवून हातचलाखी करून ६८ हजार रुपयाचा ऐवज फसवून चोरुन नेल्याची घटना नगर पुणे रोड वरील कायनेटिक चौक येथे ७ जानेवारीला सकाळी घडली.

याबाबतची माहिती अशी की आबासाहेब दादा भालसिंग (वय ६९, रा वाळकी, ता.नगर) हे नगर येथील स्वस्तिक चौकातील अभिमन्यु एंटरप्राईजेस येथे विगेन थेरपीचा उपचार घेवुन परत वाळकी येथे जाण्याकरिता कायनेटीक चौक येथील गुरुदत्त डेअरी शेजारी, एसटी बस व इतर गाड्यांची वाट पाहत थांबले. बऱ्याच वेळानंतर दोन अनोळखी इसम त्यांच्याजवळ येऊन त्यांनी देवी मंदिराचा पत्ता विचारला. भालसिंग यांनी 'मला पत्ता माहिती नाही', असे सांगितले. त्यानंतर त्यातील एका अनोळखी इसमाने त्यांच्या हातावर रुद्राक्ष ठेवला व तुमचे भले होईल, तुम्हाला चमत्कार घडेल, तुमची अंगठी व पैसे दुप्पट करुन देतो असे म्हणून त्यांना डाव्या हातातील अंगठी व खिशातील पैसे काढण्यास सांगितले. भालसिंग यांना त्यावेळी भुरळ पडल्याने त्यांनी डाव्या हातातील अंगठी व खिशातील पैसे काढुन त्यांच्याकडे दिले. त्यांनी ते त्यांच्याकडील लाल रंगाच्या पिशवीत ठेवले. आता ही पिशवी इकडे तिकडे न उघडता घरी जावुन उघडा, अंगठी व पैसे डबल झालेले असतील असे त्यांनी सांगितले. परंतु भालसिंग यांना त्यांच्या बोलण्याची व हातचलाखीची शंका वाटु लागल्याने त्यांनी थोड पुढे जाऊन पिशवी उघडी करुन पाहिली असता त्यात अंगठी व पैसे दिसुन आले नाही. त्यानंतर त्यांनी त्या दोन अनोळखी इसमांची शोधाशोध केली असता ते कोठेही दिसुन आले नाही. त्यावर त्यांची खात्री झाली की, दोन अनोळखी इसमांनी त्यांना भुरळ पाडुन हातचलाखी करुन त्यांची अर्धा तोळे वजनाची सोन्याची पिळ्याची अंगठी, ४८ हजार रोख रक्कम असा ६८ हजार रुपयांची फसवणूक केली.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी आबासाहेब भालसिंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोन अनोळखी इसमाविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम ३१८ (२),३१८ (४) अन्वये फसवणुकीच्या गुन्ह्याची नोंद केली.

# इंग्रजी बोर्डासह सर्व शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा

मुंबई – पुढील शैक्षणिक वर्षापासून मराठी विषय सक्तीचा केला जाणार आहे. यासंदर्भात राज्य सरकार लवकरच औपचारिक घोषणा करणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगितले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आल्याचे समजते. इंग्रजी शाळांमध्येही मराठी शिकवणे बंधनकारक असल्याचे दादा भुसे यांनी सांगितले. यातून कोणतीही पळवाट काढता येणार नाही, असेही दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मंगळवारी माध्यमांशी संवाद साधत शालेय शिक्षणाबाबतच्या अनेक सूचना आणि समस्या ऐकून घेतल्या. शिक्षण विभागाची पुढील वाटचाल कशी असेल, त्यासाठी काय करावे लागेल, याबाबत सध्या विविध घटकांशी चर्चा सुरू असून त्यातून शालेय शिक्षण विभागाचा रोडमॅप लवकरच तयार केला जाईल, असे दादा भुसे यांनी सांगितले.

### इंग्रजी बोर्डाच्या शाळांनाही नियम लागू

राज्यातील शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला असला, तरी सीबीएसई, आयसीएसई, केंद्रीय शाळांमध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात चालढकल होत असल्याची चर्चा असते. हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा दादा भुसे यांनी दिला. इंग्रजी भाषा आवश्यक असली, तरी महाराष्ट्रात मराठीचे महत्त्व सर्वांत जास्त आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जाही मिळाला आहे. इंग्रजी शाळांमध्ये मराठी शिकवणे बंधनकारक असतानाही अनेक ठिकाणी तसे होत नसल्याच्या तक्रारी आहेत, असेही शालेय शिक्षण मंत्री म्हणाले.

### शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य आहे. यातून त्यांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही. याबरोबरच मराठी भाषेच्या अध्यापनाला अधिकाधिक व्यापक करण्यासाठी त्या शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान असायलाच हवे, असे दादा भुसे म्हणाले.

### शिक्षण विभागाची करडी नजर

राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणे सक्तीचे असल्याचा कायदा झाला, अशी माहिती दादा भुसे यांनी यावेळी दिली. त्यामुळे कोणत्याही माध्यमाची, कोणत्याही बोर्डाची आणि व्यवस्थापनाची शाळा असली, तरी हा नियम सर्वांना लागू आहे. या नियमाच्या पालनाबाबत शिक्षण विभागाची करडी नजर या सर्व शाळांवर असेल, अशा सूचना दादा भुसे यांनी दिल्या. याबाबत टाळाटाळ करणाऱ्या शाळांची तक्रार पालकांना थेट शिक्षण विभागाकडे करता येणार असल्याचेही दादा भुसे यांनी स्पष्ट केले.

|| चौथे पुण्यस्मरण ||



**कै. दीपक दुल्लभदास पटेल**
स्वर्गवास : दि. ०८/०१/२०२१

आपल्या संस्काररुपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..
तृतीय स्मृतिदिनानिमित्त पावन स्मृतीस
**भावपूर्ण श्रद्धांजली..**
–: दुःखांकित :–
दुल्लभदास हरिदास पटेल
भानुबेन दुल्लभदास पटेल
हिनय दुल्लभदास पटेल
अलपा हिनय पटेल
किरण दीपक पटेल । विशाल दीपक पटेल
पार्थ दीपक पटेल
मेघा हिनय पटेल । केवल हिनय पटेल
समस्त पटेल परिवार, अहमदनगर





Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, A.agar 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, A.nagar. 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, A.nagar. 7447761769


२१ वे पुण्यस्मरण



तुमचे चिंतन, तुमच्या स्मृति,
आम्हाला त्यांचा आधार...
आमच्या प्रत्येक आचार-विचारात
तुमच्या प्रेरणेचा अविष्कार..

आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली!

**स्व. सुनिलराव विठ्ठलराव लोखंडे**
(मा. नगरसेवक) स्व. ९/१/२००४
– दु:खांकित –
श्रीमती मंगलाताई सुनिलराव लोखंडे (नगरसेविका)
अनिलराव विठ्ठलराव लोखंडे (मा. नगरसेवक) । सौ. जयश्री अनिलराव लोखंडे
परेश सुनिलराव लोखंडे । रोहित अनिलराव लोखंडे । मंदार सुनिलराव लोखंडे
चि. धनुष । चि. शिवम । कु. गिरीजा । चि. राघव
**समस्त लोखंडे परिवार**, माळीवाडा, अ.नगर


SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMING - 6 JAN - 8 JAN 2025




Book Your Tickets at Box Office | bookmyshow
Near Nagar College, Above Zudio, A.nagar. 9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX


# जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री. दिगंबर मारूती साळुंके** यांचे पुर्वज नामे **कै. भवानी साळुंके उर्फ धिसाडी, कै. भैरू (बहिरू) भवानी साळुंके उर्फ धिसाडी व कै. मारूती भैरू साळुंके उर्फ धिसाडी** यांच्या मालकीच्या मिळकती अहिल्यानगर (अहमदनगर) येथील कॅन्टॉन्मेंट क्षेत्र, औरंगाबाद रोड, कोठला, सावेडी, मंगलगेट, कोंडीमामा चौक, माळीवाडा, केडगाव, नालेगाव, राहुरी घोडेगाव रोड व इतर ठिकाणी, तसेच पुणे जिल्हयातील शिरूर या गावामध्ये असून सदरील मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा आहे. सदरील मिळकती खालील फोटोंमध्ये दर्शविलेले इसम नामे १) श्री. वसंत सहादू साळुंके, २) श्री. सुरेश सहादू साळुंके, ३) श्री. चंद्रशेखर किसन साळुंके व ४) श्री नितीन किसन साळुंके परस्पर खोट्यानाट्या कागदपत्रांच्या आधारे एकटे मालक असल्याचे भासवून हडप व गिळंकृत करून तिऱ्हाईत इसमांची दिशाभूल करून आमचे अशिलांचे परस्पर हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहेत. **त्याकामी आमचे अशिलांनी सदर इसमांविरूद्ध पोलीसांत फिर्याद अर्ज दिला होता. सदर प्रकरणी सदर फोटोंमध्ये दर्शविलेले इसम पोलीस स्टेशनमध्ये हजर होऊन त्यांनी सदर मिळकतींबाबत कुठलाही व्यवहार केला नसल्याचा पोलीसांना जबाब दिला आहे. या उपर सदर मिळकतींबाबत खालील इसमांशी कोणीही कुठलाही व्यवहार केला असल्यास सदरचा व्यवहार हा मूळत: बेकायदेशीर राहिल.** त्यामुळे खालील इसमांशी कोणीही करार, मदार, दान, धान, लिज, लिन, ट्रान्सफर, खरेदी विक्री, कुलमुखत्यारपत्र, विकसनकरारनामा इत्यादी करू नये. जर कोणी वरील इसमांशी आमचे अशिलांचे संमती शिवाय कुठलाही व्यवहार व करारमदार केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरचा व्यवहार बेकादेशीर व रद्द समजण्यात येईल.

सबब सदरील जाहीर नोटीस दिली असे.

**अहिल्यानगर**
**दि: ०८/०१/२०२५**

**ॲड. मयुर दिगंबर साळुंके**
फ्लॅट नं. ८, सत्यराज क्लासिक बिल्डींग,
सिटीएस २८९, शुक्रवारपेठ, पुणे ४११००२.
मोबाईल ९१५८८७४७३९


श्री. सुरेश सहादू साळुंके


श्री. नितीन किसन साळुंके


श्री. चंद्रशेखर किसन साळुंके


श्री. वसंत सहादू साळुंके

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## पेटंटस् - वाढती जागरुकता व महत्त्व

गरज ही शोधाची जननी आहे. गरज ही नाविन्याची प्रथम पायरी असली तरी तितकीच महत्त्वाची दुसरी पायरी आहे कल्पना. आजच्या कल्पकतेच्या व मार्केटिंगच्या जमान्यात तर कल्पना, कन्स्पेप्ट यांच्या महात्म्याला तोडच नाही.

या कल्पनांनी अनेकांना रंकाचे राव बनवले तर इतरांच्या कल्पनांवर स्वतःचा प्रचंड फायदा करून घेणारे प्रॅक्टीकल, स्वार्थीही आहेत. म्हणूनच नवनवीन कल्पना, नवसंशोधन, नवउत्पादन, नवनिर्मिती यांच्या चोरीला आळा बसावा यासाठी पेटंट अर्थात बौद्धिक संपदा हक्क ही कायदेसम प्रणाली जगभरात अस्तित्वात आली.

अगदी ढोबळ मानाने सांगायचे तर आपण स्वतः निर्माण केलेली कल्पना, नवनिर्मिती जी न दिसणारी अदृश्यसम व स्पर्श न करता येणारी संपत्ती जी बौद्धिक संपत्ती वा संपदा तिची नोंदणी म्हणजे पेटंट.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

मूळ व्यक्ती, संशोझधकाने स्वकल्पनेतून तयार केलेली कल्पना, वस्तू, उत्पादन याच्या नकलेपासून संरक्षणासाठी पेटंट घेणे गरजेचे ठरते. यामुळे कॉपी, नक्कल करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई करता येते.

सध्या आपल्या देशात पेटंटविषयी जागरुकता चांगलीच वाढली आहे. गेल्या वर्षी तर यात 'बूम' आली आहे. म्हणजे पहा २०१८ ते २०२३ या ५ वर्षात जेवढे पेटंट घेतले गेलेत तेवढेच २०२३-२४ या वर्षात घेतले गेलेत. चौपट वाढीच्या या प्रमाणात महाराष्ट्रही अग्रेसर आहे. या ९ महिन्यात तब्बल १ लाख ३ हजार पेटंट घेतली गेलीत.

# 'महाराष्ट्र केसरी' विजेत्यास मानाची चांदीची गदा व चारचाकी गाडी मिळणार

### नगरमध्ये होणाऱ्या 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेची जय्यत व नियोजनबद्ध तयारी सुरु : राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीप भोंडवे


अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेच्या लोगोचे अनावरण करणात महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदिप भोंडवे, सरचिटणीस हिंद केसरी पै. योगेश दोडके, अहिल्यानगर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप, उपाध्यक्ष पै. अर्जुन शेळके, महाराष्ट्र केसरी पै. अशोक शिर्के, महाराष्ट्र केसरी पै. गुलाब बर्डे, सचिव प्रा.डॉ.पै.संतोष भुजबळ, सहसचिव पै.प्रविण घुले आदी.

नगर - महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने व अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या सहकार्याने ६७ व्या वरिष्ठ माती व गादी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत २०२४-२५ लढत अहिल्यानगर शहरात होत आहेत. येत्या २९ जानेवारी ते २ फेब्रुवारीदरम्यान नगरच्या वाडियापार्क मैदानात या कुस्त्यांचा थरार रंगणार आहे. अहिल्यानगरला या सर्धेचे यजमान पद मिळाल्याचा आनंद माझ्यासह सर्व कुस्तीगीरांना झाला आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेतील अंतिम विजेत्यास रोख परितोषिक, मानाची चांदीची गदा या बरोबरच माझ्या वतीने चारचाकी गाडीही देण्यात येणार आहे, अशी माहिती अहिल्यानगर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अहिल्यानगरमध्ये होणाऱ्या महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाची व तयारीची माहिती देण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष पै. संदीप भोंडवे, सरचिटणीस हिंद केसरी पै. योगेश दोडके, अहिल्यानगर कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. संग्राम जगताप, उपाध्यक्ष पै. अर्जुन शेळके, महाराष्ट्र केसरी पै. अशोक शिर्के, महाराष्ट्र केसरी पै. गुलाब बर्डे, सचिव प्रा.डॉ.पै.संतोष भुजबळ, सहसचिव पै.प्रविण घुले आदींसह सर्व पदाधिकारी, शहर व जिल्ह्यातील सर्व पैलवान आणि वस्ताद मंडळी यांच्या उपस्थित होते. यावेळी स्पर्धेच्या लोगोचे अनावरण पाहुण्यांच्या हस्ते झाले.

आ. संग्राम जगताप पुढे म्हणाले, नगर जिल्ह्याला कुस्ती क्षेत्रात फार मोठा वैभवशाली वारसा व परंपरा आहे. तो वारसा आता पुढे नेत नव्या मल्लांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हा कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून काम केले जात आहे. शहरी व ग्रामीण भागातील युवकांना लाल मातीशी जोडण्यासाठी या क्षेत्रात आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत. या क्षेत्राल अधिक बळकटी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माझे प्रयत्न आहेत.

यावेळी पै. संदीप भोंडवे म्हणाले, अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी किताब स्पर्धेबरोबरच राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धाही होत आहेत. यासाठी तालुका व जिल्हा संघाची निवड चाचणी सुरु आहे. या स्पर्धेतील विजेत्याची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड होणार आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी माती व गादी या दोन्ही प्रकारांमध्ये फेऱ्या होणार असून माती विभागातील अंतीम विजेता व गादी विभागातील अंतिम विजेता यांच्यात महाराष्ट्र केसरी किताबसाठी अंतिम लढत गादीवर होणार आहे. विजेत्यास केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ यांच्या वतीने मानाची चांदीची गदा देण्यात येणार आहे. येणाऱ्या सर्व मल्लांची निवासाची चांगली व्यवस्था संयोजक करत आहेत. ही स्पर्धा सकाळी ७ ते १० व दुपारी ४ ते रात्री ८:३० वाजेपर्यंत चालणार असून यासाठी माती विभागाचे दोन मैदाने व गादी विभागाचे दोन मैदान तयार करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघालाच या स्पर्धांचे आयोजन करण्याची राज्य शासनाची अधिकृत परवानगी असल्याने राज्यात या स्पर्धा घेण्याचा अधिकार फक्त आम्हालाच आहे. त्यामुळे ही अधिकृत महाराष्ट्र केसरी स्पर्धा असून बाकीच्या या निमंत्रित स्पर्धा असतात. विजेत्या कुस्तीगीरास शासनाचे मानधन दिले जाते. मंत्री मुरलीधर माहोळ व मंत्री रक्षा खडसे यांच्या प्रयत्नातून 'नाडा' संस्थानाही नगरला बोलावण्यात येत असून तसे पत्र घेत कुस्तीगीरांची डोपिंग टेस्ट सक्तीची करणार आहोत. त्यामुळे डोपिंग विरहित होणारी ही स्पर्धा पहिलीच असेल.

प्रास्ताविक सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ महाले, या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघास संलग्न असलेल्या ३६ जिल्हे, ६ महानगरपालिका असे एकुण ४२ संघ यात सहभागी होत आहेत. यात सुमारे ८४० कुस्तीगीर सहभागी होत असून स्पर्धे दरम्यान सुमारे ९०० कुस्त्या होतील. स्पर्धेसाठी १०० पंच व ८० पदाधिकारी यांच्या सहकार्याने स्पर्धा पार पडल्या जातील.

पै.योगेश दोडके म्हणाले, या स्पर्धेसाठी महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे, सिकंदर शेख, हर्षवर्धन सदगीर, बाला रफीक शेख, महेंद्र गायकवाड, पृथ्वीराज मोहोळ, वेताळ शेळके, माऊली कोकाटे, शुभम शिंदनाळ, सुदर्शन कोतकर, माऊली जमदाडे हे प्रमुख आकर्षण असणार आहे.

अर्जुन शेळके म्हणाले, स्पर्धेच्या उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, केंद्रीय राज्य मंत्री पै. मुरलीधर मोहोळ, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंगल, आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष माजी खासदार रामदास तडस आदी उपस्थित राहणार आहेत.

पत्रकार परिषदेचे सूत्रसंचालन निलेश मदने यांनी केले. प्रवीण घुले यांनी आभार मानले. यावेळी उपमहाराष्ट्र केसरी बापू थेटे, उपमहाराष्ट्र केसरी अनिल गुंजाळ, पै. बाळासाहेब वाघ, पै. शंकर खोसे, पै. धनंजय खोसे, पै. सुरेश आंबेकर, पै. सोमनाथ राऊत, प्रमोद गोडसे, उत्तर महाराष्ट्र केसरी युवराज करंजुले, पै संजय शेळके, पै. मिलिंद जपे, पै. अशोक घोडके, बंडू शेळके, पै. उमेश भागानगरे, पै.अनिल वाणी, अनिल वाघ, पै. दिलीप झिंजुर्डे, पै. महेश लोंढे, निलेश मदने, यश मदने, शौर्य मदने, पै. स्वप्नील भुजबळ, पै. मनोज शिंदे आदी उपस्थित होते.

## नगर शहरात १६ जानेवारी रोजी स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलतर्फे 'विज्ञानातून प्रगतीकडे' वर कार्यशाळा


जगदीश काबरे


धनंजय आरवाडे

नगर - वैज्ञानिक आणि मराठी लेखक जगदीश काबरे यांच्या गणित व विज्ञान या विषयावर कार्यशाळेचे आयोजन स्नेहालय इंग्लिश मिडीयम स्कूलतर्फे १६ जानेवारी रोजी नगरमध्ये करण्यात आले आहे. या कार्यशाळेतील व्याख्यानाची दोन शंखले ठेवण्यात आलेली आहे. १६ जानेवारी रोजी दुपारी १.३० वाजता विज्ञान प्रेमी व शिक्षकांसाठी आणि १७ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता पालक व विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान होईल.

या कार्यशाळेचे आयोजन संस्थेच्या रवींद्रनाथ टागोर सभागृहात, स्नेहालय पुनर्वसन संकुल, एमआयडीसी, अहिल्यानगर केले आहे. जगदीश काबरे हे विज्ञानातून प्रगतीकडे या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. त्यांनी विज्ञान विषयावर ३६ हून अधिक मराठी विज्ञानविषयक पुस्तके लिहिलेली आहेत. त्यामध्ये 'शून्याचा प्रवास' या पुस्तकाला महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. काबरे हे गणित आणि विज्ञान विषय शाळांमध्ये शिकवतात आणि त्यांचा मुख्य उद्देश तरुणांना वैज्ञानिक दृष्टिकोन प्रदान करणे आहे.

त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले आहे, त्यामध्ये 'आदर्श शिक्षक' पुरस्कार, 'विज्ञान प्रसारक' पुरस्कार, ब्राईट संस्थेतर्फे चार्वाक पुरस्कार, 'ज्येष्ठ विज्ञान अभ्यासक' आदी पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांचे कार्य विज्ञानाच्या प्रचाराच्या बाबतीत अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याच सोबत स्नेहालय फौंडेशन सांगली येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक सल्लागार धनंजय आरवाडे हे बालहक्क आणि कायदे या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. स्त्री भ्रूण हत्या थांबवणे, स्त्री जन्माचे महत्त्व याची जागृती करणे, सबलीकरण, स्त्रियांच्यावर होणारे शारीरिक व मानसिक अत्याचार याचा विरोध करणे, अशा अनेक नैतिक व सामाजिक कार्य मागील दहा वर्षांपासून करत आहेत.

कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी ९९७०१२४६३९ या नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन शाळेच्या मानद संचालक राजेंद्र शुक्रे, स्नेहालय अनिवासी प्रकल्पाचे संचालक हनीफ शेख आणि शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी यांनी केले आहे.

# 'ऑपरेशन मुस्कान' मध्ये ६१ अल्पवयीन मुला मुलींचा लागला शोध

### जिल्हा पोलिसांची महिनाभर मोहीम; बेपत्ता ११५ व्यक्तींनाही शोधले

नगर - जिल्हा पोलीस दलाकडून महिनाभर राबविल्या गेलेल्या 'ऑपरेशन मुस्कान' मोहिमेत ६१ अल्पवयीन मुलांचा शोध घेतला गेला. त्यात ४९ मुली व १२ मुलांचा समावेश आहे. तसेच ११५ व्यक्तींचा शोध घेण्यातही पोलिसांना यश आले आहे. यामध्ये ६८ महिला व ४७ पुरुषांचा समावेश आहे. या सर्वांना त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

हरवलेल्या व अपहरण केलेल्या बालकांच्या व बेपत्ता पुरुष, महिलांच्या संदर्भात ऑपरेशन मुस्कान- १३' ही विशेष शोधमोहीम १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविली गेली. जिल्ह्यातील हरविलेले व पळविलेले बालके तसेच बेपत्ता महिला व पुरुषांचा शोध घेण्यात आला. पोलीस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष यांचे पथक व जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्तरावर प्रत्येकी एक पथक या मोहिमेसाठी नियुक्त करण्यात आले होते.

या पथकांकडून हरविलेले व पळविलेले अल्पवयीन मुले मुली तसेच रेकॉर्ड व्यतिरिक्त रेल्वे स्थानके, बस स्थानके, रस्त्यावर भीक मागणारी मुले, कचरा गोळा करणारी मुले, धार्मिक स्थळ, रूग्णालय, हॉटेल, दुकाने इत्यादी ठिकाणी काम करणारी मुले, बेपत्ता महिला व पुरुष यांचा प्रभावीपणे शोध घेतला गेला. यासाठी अशाकीय संस्था, बालगृह, बालकल्याण समिती, जिल्हा बालसुरक्षा कक्ष यांची याकामी मदत मिळाली.

अल्पवयीन मुले - मुली यांचे फूस लावून अपहरण केले जाते. त्यांचा शोध पोलिसांकडून घेतला जातो. परंतु ते मिळून येत नाही. त्यांच्या शोधासाठी राज्यभर दरवर्षी 'ऑपरेशन मुस्कान' ही मोहीम राबविली जाते. या कालावधीत अशा मुलांचा व बेपत्ता व्यक्तींचा विशेष शोध घेतला जातो. एक महिन्यात जिल्ह्यातील ६० गुन्ह्यातील ६१ अल्पवयीन मुलांचा शोध घेतला गेला. त्यामध्ये ४९ मुली व १२ मुलांचा समावेश आहे. ११९ बेपत्ता व्यक्तींचा शोधही घेतला गेला. त्यामध्ये ६८ महिला व ४७ पुरुषांचा समावेश आहे. बाहेरील जिल्ह्यातील रेकार्डवरील एक मुलगी मिळून आल्याने तिला बालगृहात ठेवण्यात आले आहे. यासंदर्भात मध्यप्रदेश येथे गुन्हा दाखल असल्याने तेथील पोलिसांना कळविण्यात आले आहे.

सदर मोहीम पोलिस अधिक्षक राकेश ओला, अप्पर अधिक्षक प्रशांत खैरे, उपअधीक्षक उगले यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे पो.नि. राजेंद्र इंगळे, उपनिरीक्षक बाळासाहेब शिंदे, पो.हे.कॉ.एस ए सय्यद, महिला पो.हे.कॉ. ए.आर. काळे, ए.के.पवार, महिला पो.कॉ.छाया रांधवन, चालक पो.कॉ. एस एस काळे यांच्या पथकाने राबविली.

## मोबाईल टॉवरवरील कार्डसह केबलची चोरी

नगर - नगर संभाजीनगर रोडवरील जेऊर बायजाबाई, पिंपळगाव माळवी परिसरात असलेल्या इंडस मोबाईल टॉवरवरील २१ हजार रुपये किमतीचे एअरटेल कंपनीचे १२ ए झेड एन ए व केबलसह इतर साहित्य कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की संभाजीनगर रोडवरील जेऊर बायजाबाई, पिंपळगाव माळवी परिसरामध्ये इंडस मोबाईल टॉवर वरील एअरटेल कंपनीचे कार्ड, केबल व इतर साहित्य कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेले. ही घटना कंपनीचे सुपरवायझर यांच्या निदर्शनास आली. यावरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात सुपरवायझर परमेश्वर सुधाकर राख (वय ३७, रा. निंबोडी, ता.नगर ) यांनी दिलेला फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३ (२) अन्वये अन्वये गुन्हा दाखल केला आहे.


## सौ. प्रिती कोठारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील सौ. प्रिती चेतन कोठारी (वय ३५, रा.अरिहंत बंगला, जय बजरंग व्यायाम शाळेजवळ, सारसनगर) यांचे ७ जानेवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सासु-सासरे असा परिवार आहे. त्या दर्शन कोठारी यांच्या मातोश्री होत.

## रोहित (राहुल) काटे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील रोहित (राहुल) आसाराम काटे (वय ४०) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक भाऊ, पुतणे असा परिवार आहे. रितेश काटे यांचे धाकटे बंधू होत.

# 'कौन बनेगा करोडपती'मधून बोलतोय म्हणत केली ऑनलाईन फसवणूक; कल्याणमधून एकास अटक

### नगरच्या सायबर पोलिसांच्या पथकाची कारवाई


'कौन बनेगा करोडपती'मधून बोलतोय म्हणत ऑनलाईन फसवणूक करणाऱ्याला कल्याणमध्ये पकडून नगरला आणल्यावर त्याच्या समवेत सायबर पोलिसांचे पथक.

नगर - 'कौन बनेगा करोडपती'मधुन बोलतोय तुम्हाला २५ लाखाची लॉटरी लागली आहे असे सांगुन विविध प्रोसेसिंग फी च्या नावावर नगरमधील एकाची १ लाख ३३ हजार २०० रुपयांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक करणाऱ्या आरोपीस सायबर सायबर पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. फैसल ईकबाल मेमन (रा. कल्याण, ठाणे) असे आरोपीचे नाव असून त्याला राहत्या घरून ताब्यात घेण्यात आले आहे.

नगरमधील नारायण अरुणे (रा. लक्ष्मी माता मंदिर जवळ, रामवाडी, सर्जेपुरा) यांना या आरोपीने मोबाईल वर कॉल करून तसेच व्हॉटसअॅप कॉलवरुन कॉल करुन त्यांचा विश्वास संपादन करत २५ लाखाची लॉटरी लागली आहे असे सांगुन विविध प्रोसेसिंग फी चे नावाखाली दि. २० ऑगस्ट २०२१ ते १० मार्च २०२२ या कालावधीत फोन पे वर सुमारे १ लाख ३३ हजार २०० रुपये पाठविण्यास भाग पाडले. त्यानंतर त्यांच्याशी संपर्क टाळत फसवणूक केली. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. या गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपीचा मोबाईल नंबर, बैंक अकांऊटवरुन आरोपी फैसल मेमन याचे नाव तांत्रिक विश्लेषणाव्दारे निष्पन्न झाले. आरोपीचा शोधार्थ वेळोवेळी कल्याण ठाणे येथे जाऊन शोध घेतला असता आरोपी हा मिळुन आला नाही तदनंतर तांत्रीक विश्लेषणाव्दारे आरोपीचा शोध घेतला असता तो सोमवारी सायबर पोलिसांच्या पथकाला सापडला. पथकाने त्याला अटक केली आहे. सदरची कारवाई सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम, उपनिरीक्षक योगेश चाहेर, पोलीस अंमलदार अभिजीत अरकल, मल्लिकाअर्जुन बनकर, उमेश खेडकर, दिगंबर कारखेले, अरुण सांगळे, महिला अंमलदार सविता खताळ, दिपाली घोडके यांनी केली आहे.

### सायबर पोलिसांचे नागरिकांना आवाहन

'कौन बनेगा करोडपती'मधून आपणास २५ लाख रुपयाची लॉटरी लागली आहे, क्रेडिट कार्ड अॅक्टीव्हेशन करुन देतो, ऑनलाईन केवायसी पडेट करुन देतो, पेट्रोल पंप एजन्सी देतो, ट्रेडिंग अॅप डाऊनलोड करुन जास्त प्रमाणामध्ये परतावा देतो असे वेगवेगळ्या आमिषाला बळी पडु नये. प्रत्येक अनोळखी व्यक्तीशी आर्थिक व्यवहार करतांना काळजी घ्यावी. तसेच कोणत्याही प्रकारे आर्थिक फसवणुक झाल्यास तात्काळ सायबर क्राईम पोर्टल हेल्पलाईन नंबर १९३० यावर तक्रार करावी, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

## कॉपर वायरची चोरी

नगर - बंद दुकानाचे शटर उचकटून कोणीतरी अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत दुकानातील दहा हजार रुपये किमतीची कॉपर वायर चोरून नेली. ही घटना ४ जानेवारी ते ६ जानेवारी दरम्यान संभाजीनगर रोडवरील जिओ पेट्रोलपंपा समोरील सिटी रिपेरिंग वर्क्स या दुकानात घडली.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सलीम रज्जाक शेख (वय ५३, रा. इक्रा शाळेजवळ, गोविंदपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय सहिता २०२३ चे कलम ३०३ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## बूथ हॉस्पिटलमध्ये ११ जानेवारी रोजी मोफत सर्वरोग निदान तपासणी शिबीर

नगर - रोटरी क्लब अहिल्यानगर, साल्वेशन आर्मी बूथ हॉस्पिटल, एन सी डी सेल सिव्हिल हॉस्पिटल, गरुड कॅन्सर हॉस्पिटल, केअरिंग फ्रेंडस स्नेहालय, समता फाऊंडेशन, एच व्ही देसाई नेत्र रुग्णालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जानेवारी रोजी सकाळी ९ ते १.३० वाजेपर्यंत बूथ हॉस्पिटल, एस.बी.आय चौका जवळ, जनरल पोस्ट ऑफिस समोर अहिल्यानगर येथे सर्व वयोगटा करीत नवजात शिशु, लहान लेकरे, महिला पुरुष व वयो वृद्ध यांच्या साठी अनेक तज्ञ डॉक्टरांकडून कॅन्सर, त्वचेचे आजार, नेत्र तपासणी, हृदय रोग, दंत चिकिस्ता, मधुमेह, लठठपणा, सांधे दुखी, गुडघेदुखी, हाडांचे विकार, मूळव्याध, बालरोग निदान, आतड्याचे, लिवर, किडणीचे विकार, मोफत तपासणी, रक्त तपासणी, एक्सरे, ईसीजी मोफत केले जाणार आहे.

डॉ. प्रकाश गरुड (कॅन्सर तज्ञ), डॉ. वेदांत लड्ढा (त्वचा रोग तज्ञ), डॉ. सौ. पद्मजा गरुड (स्त्री रोग व कॅन्सर तज्ञ), डॉ. शेहनाज आयुब (बालरोग तज्ञ), डॉ.रुपेश सिकची (लहान बालकांचे सर्जन), डॉ. राहुल कांडेकर (लिवर ट्रान्सप्लांट व गॅस्ट्रो सर्जन), डॉ. ज्योत्स्ना भराडिया (मधुमेह व हृदयरोग तज्ञ), डॉ. अनिल जाधव (एम.डी. मेडिसिन सामान्य आजार तज्ञ), डॉ. अरविंद गीते (ऑर्थोपेडिक तज्ञ), डॉ. अजय साबळे (एम.डी. मेडिसिन क्रिटिकल केअर तज्ञ), डॉ.राहुल गाडेकर (एम.डी मेडिसिन मधुमेह व हृदयरोग तज्ञ), डॉ. कीर्ती सोलट (स्त्री रोग व प्रसूती तज्ञ), डॉ. ममता कांबळे (दंत चिकित्सक), डॉ. राहुल मगर (कान नाक घसा तज्ञ), सौ. शितल शिंदे (आहार तज्ञ), डॉ.वृषाली महांडुळे (त्वचा रोग तज्ञ), डॉ. सचिन साळे (दंत चिकित्सक), डॉ. अक्षय झिने एम. बी. बी. एस हे तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करणार आहे. या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन बूथ हॉस्पिटल प्रशासनाने केले आहे.

संपर्क : ब्रदर प्रवीण साबळे ९२७० ०७ ०८४६, ब्रदर अमित पठारे ८९७५३७२२५४

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आला हिवाळा स्नायूंना सांभाळा

हिवाळ्यामध्ये स्नायू पेटके आणि पाय दुखणे सामान्य आहे. हिवाळ्यात स्नायूंच्या ताणापासून मुक्त होण्याचे हे काही मार्ग आहेत. स्नायूंना उबदार ठेवण्यासाठी हीट पॅड किंवा गरम पाण्याची बाटली वापरा. नियमित स्ट्रेचिंग करा जेणेकरून स्नायू लवचिक राहतील. हलका योग किंवा चालण्याने स्नायूंचा ताण कमी होतो.

## पाककला

### शुगर कुकी

**साहित्य :** एक वाटी मैदा, एक वाटी साखर, अर्धी वाटी लोणी अगर डालडा, एक अंडे, दोन चमचे बेकिंग पावडर, पाव चमचा मीठ, पाऊण वाटी दूध, एक चमचा व्हॅनिला इसेन्स

**कृती :** साखर, लोणी अगर डालडा व मीठ एकत्र करून चांगले फेसावे. त्यात अंडे फोडून त्याचा बलक घालावा व मिश्रण सारखे करावे. नंतर त्यात मैदा, बेकिंग पावडर, दूध व व्हॅनिला इसेन्स घालून, सर्व जिन्नस चांगले मिसळून व मळून गोळा तयार करावा. तो गोळा पोळपाटावर लाटून, पाहिजे त्या आकाराची बिस्किटे पाडावीत व ओव्हनमध्ये भाजावीत.

## वास्तू

### शाळेची मुख्य इमारत

* मुख्य तसेच सर्वात उंच व मोठी इमारत नैऋत्य दिशेत असावी. त्या खालोखाल आग्नेय व त्यानंतर वायव्येत उतरत्या क्रमाच्या इमारती व मजले असावेत.

* मुख्य इमारतीचे प्रवेशद्वार पश्चिम-वायव्य किंवा दक्षिण-आग्नेय किंवा पाचपैकी कोणत्याही एका सुविधाजनक दिशेत घेणे चांगले.

## सल्ला

भात बुडाला लागल्यास भांड्याच्या खाली थोडे पाणी घालून, त्यावर ते भांडे थोडा वेळ ठेवावे, म्हणजे बुडाला लागलेला जिन्नस चटकन सुटून येतो.

## सौंदर्य

आय-लायनरने डोळ्यांचे आकार उठावदार करता येतात. डोळे छोटे असतील, तर आय-लायनर जाड रेषेत लावावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ९ जानेवारी २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष शुक्लपक्ष, भरणी १५।०७, सूर्योदय ०६ वा. ३४ मि. सूर्यास्त ०५ वा. ४५ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** मतभेद आणि अनोळखी लोकांचा विरोध आपणास अस्वस्थ करू शकते.

**वृषभ :** वरिष्ठांकडून कौतुक होईल. दिवस आनंदात जाईल.

**मिथुन :** कार्यक्षेत्रातील एखाद्या कल्पक सर्जनशील कार्यात प्रगति होईल, एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबरोबर सामंजस्य वाढेल.

**कर्क :** मीटिंगच्या माध्यमातून शिकवण्याची किंवा शिकण्याची संधी मिळेल.

**सिंह :** आज नवीन संबंध स्थापित करणे, माहितीची देवाण-घेवाण, कसोटी घेणारा हा दिवस आहे.

**कन्या :** अनेक गोष्टींसाठी आजचा दिवस निर्णायक ठरेल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**तूळ :** महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल. प्रवासाचे योग संभवतात. वाहने बिघडतील.

**वृश्चिक :** अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील.

**धनु :** वेळेकडे लक्ष ठेवा. कार्यात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल.

**मकर :** कार्य सुरळीत होतील. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल.

**कुंभ :** मनातल्या इच्छा पूर्ण होतील. उत्साहजनक बातम्या मिळतील. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील.

**मीन :** मित्रांचा लाभ मिळेल. मानसन्मान होईल. आपल्यासाठी अनुकूल वेळ आहे व महत्त्वाच्या कार्यांमध्ये यश मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### भाग्य

दामूअण्णा आपल्या पत्नीला म्हणाले, 'तुझ्या गायन कलेने माझं भाग्य उदयास आलं'
'ते कसं?' पत्नीने विचारले.
'तुझ्या गाण्याच्या रियाजामुळे आपल्या शेजाऱ्याने त्याचं घर मला निम्म्या किंमतीला विकत घेण्याचा प्रस्ताव मांडला आहे.'

# जागतिक आश्चर्ये


### पेंट्यागॉन

युनायटेड नेशन्सच्या संरक्षण मंत्रालयाची मुख्य कचेरी असलेली ही इमारत अलिंग्टन येथे बांधण्यात आली आहे. व्हर्जिनिया प्रांताचा आलिंग्टन हा भाग आहे. हे अमेरकेच्या संरक्षण मंत्रालयाचा कारभार येथून चालतो. वरुन पाहिल्यावर ही इमारत पंचकोनी आकाराची दिसते.

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७०८९

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) गोंधळाची अवस्था; अराजक ७) स्थिति; दशा; वाईट अवस्था ८) घराच्या मागची मोकळी जागा १०) रत्न १२) मौज; मजा; रंगविण्याचे साधन; कलर १३) अंगाला शेंदूर फासून मरीआईच्या नावाने भिक्षा मागणारा १५) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; मकर; नक्र १६) प्रचंड; टोलेजंग १७) हा उगाळावा तितका काळाच असतो १८) सोललेल्या उसाचा तुकडा; गंडेरी १९) तह; एक वेद; सलोखा; समेट २०) साफसूफ; चकपक; टापटीप

**उभे शब्द :-** १) गायनातील एक राग; रंग; मौज २) चिनी मातीच्या पेल्यांत पाणी भरून त्यातून सप्तस्वर काढणारे वाद्य ३) देवाचे नाव, मंत्र वगैरेचा पुन्हा पुन्हा उच्चार ४) एक पक्वान्न ५) एक केसाळ जंगली प्राणी; अस्वल ६) पिसारा फुलविणारा भारताचा राष्ट्रीय पक्षी ९) भांड्याचे तोंड बंद करण्याचे वस्त्र ११) नटून थटून गावभर हिंडणारी स्त्री १४) अल्पसा; थोडासा १५) एक प्रकारचे रत्न १७) थोडेसे गरम (दूध, पाणी वगैरे) १९) एक मराठी आडनाव; प्रसिद्ध दिवंगत गुरुजी

**शब्दगंध क्र. ७०८८ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग | री | ब | ■ | स | भा | प | ती |
| र | स | द | ■ | र | ■ | त | र |
| ग | ■ | ना | म | दा | र | ■ | क |
| री | ■ | म | ग | र | ■ | स | मा |
| त | मा | ■ | ■ | ■ | क | व | न |
| ■ | व | र | व | र | ■ | ल | ■ |
| ख | ळ | ब | ळ | ■ | प | त | न |
| स | ती | ■ | सा | ख | र | ■ | दी |

# मुलांचे विश्व

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** अपराधी भावना मनात ठेवून जगण्यापेक्षा, दिलगिरी व्यक्त करुन मोकळे व्हा. ते जास्त सोपं आहे.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## कंटकचर्मी प्राणी म्हणजे काय?

कंटकचर्मी प्राणी केवळ सागरनिवासीच असतात. यांचे शरीर त्रिस्तरीय आणि सत्य देहगुहायुक्त असते. यांच्या अळी अवस्थेमध्ये द्विपार्श्व सममिती असते; मात्र प्रौढावस्थेत ते पंचअरिय सममिती मिळवतात. प्रचलनासाठी यांना नलिकापाद असतात. या नलिकापादांनी ते अन्न देखील पकडू शकतात. जे प्रचलन करीत नाहीत ते स्थानबद्ध असतात.

यांचे कंकाल कॅल्शिअमयुक्त कंटकींचे किंवा पट्टिकांचे बनलेले असते. कंटकची प्राण्यांमध्ये पुनर्जनन क्षमता खूप चांगली असते. हे प्राणी बहुतेक एकलिंगी असतात. उदाहरणे : तारामासा, सी-अर्चिन , ब्रिटलस्टार, सी-ककुंबर इत्यादी

एकायनोडर्माटा (कंटकचर्मी) प्राणिसंघातील अँटेडॉन प्राणी समुद्राच्या तळाशी राहतात. ते कायमचे दगडाला चिकटून राहत असल्याने त्यांच्यात संचलन नसते. तारामीन या प्राण्याला पाच बाहू असतात. प्रत्येक बाहूच्या खालच्या भागावर नलिकांसारखे असंख्य पाय (नालपाद) असतात. पायाच्या टोकाकडील भाग चपटा असतो. हे पोकळ पाय तारामिनाच्या शरीरात असणाऱ्या एक चक्राकार व पाच सरळ नळ्यांनी युक्त असलेल्या तंत्राशी (जलवाहिका तंत्राशी) जोडलेले असतात. या नळ्यांमधून पाणी फिरत असते. जेव्हा हे प्राणी पायांत शिरते, तेव्हा नलिका लांब होऊन तारामीन या पायांवर आपला तोल व वजन सांभाळतो आणि पायांच्या हालचालींमुळे संचलन करतो. जेव्हा या पायांतील पाणी शरीरातील सरळ आणि चक्राकार नलिकांत खेचले जाते त्या वेळी हे पाय आकुंचन पावतात आणि तारामिनाची हालचाल थांबते.

याच संघातील अर्चिन या प्राण्याच्या तोंडाजवळील भागात पाच दातांची विशिष्ट रचना आढळते. हे दात पूर्वी ग्रीक लोक वापरीत असलेल्या दिव्यासारखे दिसतात म्हणून त्यांना 'रिस्टॉटलचा कंदील' असेही म्हणतात.

या दातांचा उपयोग केवळ अन्नाचे तुकडे करण्यासाठीच होतो असे नसून संचलनासाठीही होतो. या प्राण्याला तारामिनासारखे नालपाद असतात. शरीरावर असणाऱ्या असंख्य काट्यांचा व या पायांचा संचलनासाठी उपयोग होतो. मंगुरतारा(ब्रिटल स्टार) या प्राण्याच्या गोलाकार शरीरावर पाच लांब आणि निमुळते बाहू असतात. या बाहूंत असणाऱ्या स्नायूंच्या साह्याने बाहूंचे आकुंचन व प्रसरण होते आणि बाहूंच्या हालचालीमुळे हा प्राणी संचलन करू शकतो. अशा तऱ्हेने अपृष्ठवंशी प्राणी पाण्यात किंवा जमिनीवर संचलन करण्यासाठी आपले सर्व शरीर, उपांगे, विशिष्ट ग्रंथींमधील स्राव इत्यादींचा उपयोग करतात.

## भक्तीचं समाधान

एक गाव होतं. त्या गावात एक देवभक्तीत रमणारा माणूस राहत होता. त्याचे नाव शामराव! शामराव गेल्या अनेक वर्षांपासून देवाची भक्ती करीत होता. त्याच्या भक्तीची कीर्ती गावोगावी पोहोचली होती. एकदा शामरावाच्या मनात विचार आला की, आजवर मी देवाची एवढी भक्ती केली, पण देवानं मला कधीच दर्शन दिलं नाही. त्याच्या मनाला मग देवदर्शनाची ओढ लागली. पण त्याला देवदर्शन काही झालं नाही.

एकदा त्या गावात एक साधू आला. त्याचा मुक्काम गावात श्रीराममंदिरात होता. हा देवभक्त त्याला जाऊन भेटला आणि म्हणाला, महाराज, मी अनेक वर्षे मनोभावे देवाची भक्ती करतो आहे. पण देव मला दिसला नाही. देव कसा असतो ते मला माहीत नाही. देवाला प्रत्यक्ष बघण्याची माझी इच्छा आहे. मला मार्गदर्शन करा.

त्यावर साधू म्हणाला, रानातल्या डोंगरावर देवाचं घर आहे. तो पत्ता मी तुला सांगतो, तिथे तुला देव भेटेल.

साधूकडून पत्ता घेऊन तो भक्त रानातल्या डोंगरावर गेला. देवाचं घर त्याने शोधून काढलं. देवाच्या घराला खूप पायऱ्या होत्या. त्या पायऱ्या तो चढू लागला. पायऱ्या चढताना त्या भक्ताच्या मनात विचार आला. देवाला भेटून आपण काय करणार ? फक्त त्याला पाहणारच ना. आपण एकदा देवाला बघितलं तर त्याच्याबद्दलची ओढ कमी होईल. मग भक्तीत रस राहणार नाही. तो अज्ञात आहे म्हणून आपण त्याची भक्ती करतो. भक्ती हीच आपली शक्ती आहे. तेच खरे समाधान आहे.

हा विचार मनात येताच तो भक्त पायऱ्या उतरून परत खाली आला. आपल्या गावी जाऊन पूर्वीसारखी भक्ती करू लागला.

तात्पर्य : देवदर्शनापेक्षा भक्तीचं समाधान काही औरच असतं.

# रहमते दर्शन (भाग - १)



## वे दया सागर थे

में सत महाराज जी ने पास खड़े हुए चोपड़ा साहब से कहा, 'इन्हें भाई। संग के इंचार्ज हैं, के नाम एक चिट्ठी लिख कर दे दो। मैं चिट्ठी लेकर पटना पहुँचा तो जितने भी भाई-बहन मुझे वहाँ मिले, उन्होंने मुझे इतना अधिक प्यार दिया कि मैं उसका वर्णन नहीं कर सकता। पटना में कार्यरत रहते हुए मुझे कार्यालय के कार्य से अक्सर दिल्ली भेजा जाता रहा और इस प्रकार मेरी 'जल्दी बुलाने की प्रार्थना स्वीकार हुई। पटना रहते-रहते मुझे दो साल बीत गये। मैंने एक दिन हुजूर से अर्ज़ की कि अब वापिस बुला महाराज जी ने कहा अभी एक साल का ंिशर्पीश (कार्यकाल) और बाकी है। फिर भी तुम कोई कारण दे कर अर्जी दे दो। मैं सोचता रहा। क्या कारण दूँ? कोई कारण नहीं मिला जिसके आधार पर मैं स्थानांतरण की अर्जी दे सकता। मित्रों ने सलाह दी कि कोई भी कारण दे दो, चलेगा। पर मैं झूठा कारण नहीं देना चाहता था।

इसी बीच मेरठ में दंगे हो गये। मेरे छोटे लड़के को बुख़ार आ गया और अधिक कार्य के कारण उसका इलाज ठीक से नहीं हुआ। उसे दिल्ली लाया गया तो डॉक्टरों से जाँच के पश्चात पता चला कि उसका दिल फैल गया था। मुझे तार देकर बुलवाया गया। मैं एक्स-रे की रिपोर्ट आदि लेकर महाराज जी के पास पहुँचा। महाराज जी ने बड़े गौर से सब कागज़ देखे और मेरे हाथ में थमा दिये। तेज़ हवा चल रही थी, वे कागज़ मेरे हाथ से छूट गये और उड़ने लगे। मैं उनको इकट्ठा करने लगा तो महाराज जी ने कहा, देखना छूट न जायें। मेरी समझ में यह बात नहीं आई और मैं मत्था टेक कर वापिस घर पहुँचा।

अगले दिन डॉक्टर के पास पहुँचा तो डॉक्टर ने अल्ट्रा-साऊंड कराने के लिए कहा। जब हमने अल्ट्रा-साउंड कराया तो डॉक्टर ने कहा, इसे तो कोई बीमारी नहीं है। फिर से एक्स-रे कराओ। एक्स-रे फिर से हुआ तो उसमें भी कुछ नहीं मिला। परन्तु, जिस डॉक्टर के पास इलाज चल रहा था, वह मानने को तैयार नहीं था कि कोई बीमारी नहीं है। हमने फिर एक्से-रे कराया, फिर डॉक्टर को दिखाया, तब वह माना कि लड़के को कोई बीमारी नहीं है। अब मुझे प्रार्थना पत्र में कारण लिखने का बहाना मिल गया यानी 'लड़के की बीमारी का कारण' और मेरा स्थानांतरण दिल्ली हो गया।

इस प्रकार की और भी अनन्त घटनाएँ हैं, जिनका वर्णन मेरे सामर्थ्य से बाहर है। दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज ने मुझ पर बेइन्तिहा दया की। उन्हीं की दया के कारण आज भी मैं सत्संग के और अपने दुनियावी कार्य बखूबी कर पा रहा हूँ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

ऐसे ही विश्व के लीडर्स प्रति अच्छी भावनाएं भेजें जिस से सारे विश्व का कल्याण होगा। इसी तरह मुख्य मन्त्रियों और विभिन्न विभागों के अध्यक्षों को मन से तरंगे भेजें तो वह अपने क्षेत्र में अच्छे कार्य करेंगें जिस से जनता सुखी होगी। ये कार्य हर रोज हर घंटे ५ मिनट जरूर करना है। एक दिन सारा विश्व आप को ढूंढ़ता हुआ आप के पास पहुंच जाएगा और आप को सता सौंप देगा और आप महाराजा होंगे।

दिमाग और कल्पना

कल्पना ही आविष्कार कराती है। कल्पना ज्ञान से भी शक्तिशाली है। कल्पना में अनन्त शक्तियां हैं। मस्तिष्क ताला है और कल्पना चाबी है। मस्तिष्क में सब कुछ है। आप क्या प्राप्त करना चाहते हैं। राजनेता बनना चाहते हैं, व्यापारी बनना चाहते हैं, आफिसर बनना चाहते हैं, आप अष्ट रत्न बनना चाहते हैं या कुछ और बनना चाहते हैं। आप जो भी बनना चाहते हैं उस लक्ष्य को कल्पना में देखें। इस लक्ष्य को प्राप्त करने के लिये प्लेनिंग बनाओ। आप को कौन सी पुस्तकें पढ़नी पड़ेंगी। पैसा कहां से आएगा। किन किन व्यक्तितियों से सहयोग लेना पड़ेगा। यह सब योजना बना लो और उसे धरातल पर लाना शुरू कर दो। आप मनचाहा लक्ष्य प्राप्त कर लेंगे।

## दिमाग की शक्ती

हमारे दिमाग में प्रति क्षण विचार आते रहते हैं। कभी रूटीन की परेशानियों के विचार, कभी नौकरी के विचार, कभी परिवार के विचार, कभी भोजन के विचार और कभी आदतों के बारे विचार । जब कोई भी विचार आता है तो दिमाग में एक चित्र सा बन जाता है। विचारों के इस क्रम को तोड़ कर हम वही सोचें, वही देखे, जो हम चाहते हैं। ये कल्पना हमें वही प्राप्त करा देगी जो हमने सोचा है। हम जो बनने की कल्पना करते हैं, वही बनते हैं। आप कैसा बनना चाहते हैं, आप क्या बनना चाहते हैं, इस की कल्पना मस्तिष्क में करते रहो। ये तकनीक आप को वहां पहुंचाने में मदद करेगी जहां आप पहुचना चाहते हैं। आप को इंटरव्यू देना है। संभावित दृश्य बनाएं। इंटरव्यू में प्रश्नों की बौशार हो रही है। आप सफलता पूर्वक प्रश्नों के उतर देते हैं और आप का इंटरव्यू सफल रहता है। आप का सेलेक्शन पक्का है। ऐसे ही आप की जो भी कोई और अच्छी इच्छा है, लक्ष्य है उसको कल्पना में होता हुआ देखें। फिर यह धरातल पर भी आ जाएगा। जो भी कल्पना करें, उस कल्पना और अपने बीच शिव बाबा या अपने ईष्ट को भी देखते रहने से आप को सफलता बहुत जल्दी मिलेगी दिमाग और स्मरण शक्ति की क्षमताएं अनन्त हैं। ८०% मानसिक शक्तियां सुप्त पड़ी हैं। हमें भूल गई हैं। यह शक्तिया दिमाग में बहुत गहरे स्तर पर उपलब्ध हैं। इन्हें निकालने की विधियां सीखनी पड़ेगी। विधियां सीख कर उनका अभ्यास करना है।

कुछ विधियां ऐसी हैं जिन के लिये अधिक प्रयास करना है। राजयोग और दूसरी ध्यान साधनाएं इस सूची में आती हैं। यह विधियां धीरे धीरे काम करती हैं, इस लिये धैर्य नहीं खोना है। अभ्यास के बाद यह विधियां आसान बनती जाएगी। परंतु हमारे पूर्वजों ने और भी

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

एकूणच पूजाअर्चेतून सात्त्विक वातावरण तयार होऊन बाळावर आध्यात्मिक संस्कार होतात. गर्भवतीलादेखील यातून मनःशांती मिळते. याचे विशेष मार्गदर्शन स्तोत्र व मंत्रोपचार प्रकरणामध्ये केलेले आहे. ८. घरातील कामे (९.३० ते ११.०० पर्यंत) : घरातील स्वयंपाक किंवा इतर कामे करावीत. कामे करीत असताना गर्भसंस्कार सीडी, शास्त्रीयसंगीत, भक्तीसंगीत, तानपुरा, बासरीवादन यांची सीडी लावावी.

९. दुपारचे जेवण (११.०० ते १२.००) : दुपारचे जेवण परिपूर्ण असावे. जेवणामध्ये काय पदार्थ खावेत हे आपण आहारामधील तक्ता पाहून ठरवावे. जेवण ताजेच जेवावे. शिळे पदार्थ, शिळे अन्न खाऊ नये. शांतचित्ताने बाळाच्या व स्वतःच्या शरीराच्या पोषणाचा विचार करूनच जेवण करावे. अति घाई, अति बडबड, अति चिडचिड करत जेवण करू नये. जेवण झाल्यावर पानपसंद विडा खावा; त्यामुळे खाल्लेले अन्न पचण्यास मदत होते.

१०. कला जोपासणे (१२.०० ते १.००) : जेवण घेतल्यानंतर लगेचच आराम करू नये, कारण खाल्लेले अन्न ढेकर येणे, मळमळ, उलटी होणे असा त्रास होऊ शकतो; म्हणून थोडी बरोबर एखादा आवडता छंद जोपासावा. विणकाम, भरतकाम, चित्र काढण, एखादे पुस्तक वाचणे असे छंद जोपासावेत. कुठलेही काम करताना तान सीडी सौम्य आवाजात चालू ठेवावी

## गर्भावस्थेतील आजार व उपचार

गर्भावस्थेत मधुमेहाचे निदान झाल्यास गर्भवती स्त्रीने लघवी व रक्त वरचेवर तपासून रक्तातील साखरेचे प्रमाण वाढले तर नाही ना हे बघून घ्यावे. साखरेचे प्रमाण हे योग्य आहार, योगासने यांनी नियंत्रित ठेवता येते. एवढे करूनही जर रक्तात साखरेचे प्रमाण वाढलेले असले, तर इन्सुलिनचे इंजेक्शन घेऊन किंवा त्यावरील औषधोपचार करून तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने मधुमेह आटोक्यात ठेवावा.

मधुमेह असलेल्या गर्भवतीचे बालक जास्त धष्टपुष्ट असते; त्यामुळे गर्भवती स्त्रीने स्वतःच्या वजनावर लक्ष ठेवावे. गोड पदार्थ, मिठाई, साखर, जास्त मीठ असलेले पदार्थ खाऊ नयेत. मधुमेह व रक्तदाब हे एकमेकांशी संबंधित आजार आहेत. रक्तदाब नियंत्रित राहण्यासाठी जास्त तेलकट, तूपकट, मीठाचे पदार्थ खाऊ नयेत. आयुर्वेदा मध्ये गर्भावस्थेतील अतिरक्तदाबावर सर्पगंधा घन वटी, सर्पगंधा चूर्ण, भृगराज स्वरस, अर्जुन चूर्ण, पुनर्नवा घन, ब्राम्हीचूर्ण, या औषधी द्रव्यांचा वापर करण्यास सांगितला आहे; परंतु ही सर्व औषधी तज्ज्ञ अनुभवी वैद्यांच्या सल्ल्यानुसार वापरावीत. रक्तदाब फार वाढला, तर गर्भवतीला झटक्यांसह फिट येऊ लागते. या आजाराला 'एक्लाम्पसिया' म्हणतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# शिक्षक गोरगरिबांच्या पिढ्या घडवीत आहे

### खा. निलेश लंके यांचे प्रतिपादन; केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात जिवंत झाले महाभारतातील प्रसंग

नगर – मोठ्या प्रमाणात शिक्षण घेत असलेल्या मुलींची शाळा पाहून मला समाधान वाटले. मुलींसाठी असलेली शैक्षणिक संस्था इतकी मोठी असून, अनेक मुलींनी शिक्षण घेऊन आपले भवितव्य घडविल्याचा सर्वांना अभिमान वाटत आहे. महाराणी ताराबाईचा वारसा पुढे घेऊन जाणाऱ्या या मुली आहेत. शिक्षक हे गोरगरिबांच्या पिढ्या घडविण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.



केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात स्नेहसंमेलनप्रसंगी खासदार लंके, शिक्षक व विद्यार्थी.

केडगावच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी खासदार लंके बोलत होते. इंजिनियर प्रसाद आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे सचिव बबनराव कोतकर, संस्थेचे अध्यक्ष रमेश गवळी, उपाध्यक्ष जाफर शेख, खजिनदार प्रल्हाद साठे, रावसाहेब सातपुते, जयद्रथ खाकाळ, डॉ. सुभाष बागले, जयश्री कोतकर, मनीषा थोरात, छाया सुंबे, ज्ञानदेव बेरड, नंदेश शिंदे, संजयकुमार निक्रड, मुख्याध्यापिका वासंती धुमाळ, सखाराम गारुडकर, रेणुका म्हस्के, भारती गुंड आदींसह सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

पुढे खासदार लंके म्हणाले की, या शाळेत शिक्षणाबरोबर मुलींच्या विविध कलागुणांना वाव दिले जात आहे. मुलींचा मैदानी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमात चांगला सहभाग असतो, याचे सर्व श्रेय शिक्षकांना जाते. चांगल्या दर्जाचे शिक्षण या ठिकाणी मिळत असून, गुणवंत मुली घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका वासंती धुमाळ यांनी अहवाल वाचन करुन विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख मांडला. शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींना निलेश लंके व प्रसाद आंधळे यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौतुकाबरोबर शिक्षकांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिक्षकेतर कर्मचारी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

स्नेहसंमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात नाट्य व नृत्याचे उत्कृष्ट सादरीकरण विद्यार्थिनींनी केले. स्नेहसंमेलनात महाभारतातील विविध प्रसंग सादर करण्यात आले होते. तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पराक्रमाचे सादरीकरण कार्यक्रमातून करण्यात आले. विद्यार्थिनींनी शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व महाभारत मधील विविध पात्र साकारले होते. उपस्थित प्रेक्षक व पालकांनी टाळ्यांच्या कडकडाटात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली. मोबाईलमुळे होणारे दुष्परिणाम दाखवणारा मूक अभिनयाने सर्वांचे लक्ष वेधले. सांस्कृतिक कार्यक्रमात पहिली ते बारवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनीनी सहभाग नोंदवून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रस्तावित बबन साळवे यांनी केले. सूत्रसंचालन जालिंदर सातपुते व जयश्री कोतकर यांनी केले. आभार सखाराम गारुडकर यांनी मानले.

स्नेहसंमेलन यशस्वी होण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



स्तवन प्रभू याची कॉर्फबालच्या १९ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

# खेळ व खेळाडूंच्या विकासासाठी विशेष प्रयत्न

### पद्मश्री पोपटराव पवार यांचे प्रतिपादन

नगर – अहमदनगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनच्या माध्यमातून विविध खेळ व खेळाडूंच्या विकासासाठी आम्ही विशेष प्रयत्नशील आहोत, असे प्रतिपादन असोसिएशनचे अध्यक्ष व माजी क्रिकेटपटू पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

नगरचा युवा खेळाडू स्तवन प्रभू याची कॉर्फबालच्या १९ वर्षाखालील महाराष्ट्र राज्य संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली होती. या संघाने देशपातळीवर तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल स्तवनचा कॉर्फबॉल असोसिएशनच्यावतीने पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शासन, प्रशासन व क्रीडाप्रेमींच्या माध्यमातून क्रीडा विकास साधला जाईल, असे पोपटराव पवार यांनी म्हटले.

सचिव किशोर गांधी म्हणाले, असोसिएशनने कॉर्फबॉल खेळासाठी शहरात पहिले मैदान उभे केले. कॉर्फबॉलच्या भावी खेळाडूंबरोबरच बास्केटबॉलच्या खेळाडूंनाही दर्जेदार प्रशिक्षण मिळवून देण्यासाठी योजना तयार केली जात आहे.

उपाध्यक्ष डॉ.प्रकाश कांकरिया यांनीही स्तवनच्या कामगिरीचे कौतुक करून भविष्यातील योजनांना आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

यावेळी स्नेहालयचे डॉ.गिरीश कुलकर्णी, हिंद सेवा मंडळाचे अजित बोरा, डॉ.प्रशांत सुरकुटला, ॲड.हर्षल सेलोत, आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान गांधी, डॉ.सुधा कांकरिया, डॉ.नगरे दाम्पत्य आदी उपस्थित होते.

# श्री महेंद्रऋषिजी म सा आदि ठाणा ३ यांचे आनंदधाम येथे २० जानेवारीला आगमन



नगर – गुरु आनंद पदस्पर्शाने पावन भूमि आनंदधाम येथे २० जानेवारी रोजी श्रमण संघीय युवाचार्य श्री महेंद्रऋषिजी म सा आदि ठाणा ३ यांचे आपल्या शिष्यांसह आगमन होणार आहे. दुर्ग छत्तीसगड, हैद्राबाद, चेन्नई येथील यशस्वी चातुर्मास करुन व उग्र विहार करत संतवृंद आनंदधाम वर येत आहेत. सर्व गुण संपन्न व प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले युवाचार्य महेंद्रऋषिजी यांची गुरुदेव आचार्य भगवंत यांच्यावर असलेली अतुट श्रद्धा भक्ती व त्यांचे श्रमणसंघास व समाजास मिळणारे स्नेह मार्गदर्शन या विषयी समाज सदैव कृतज्ञ राहिल असे सांगून पूज्यवरांचे आनंदधाम वरील आगमन प्रसंगी भाविक भक्तांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रावक संघाचे अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी केले.

संपूर्ण भारतभर जैन धर्माचा प्रचार प्रसार करून त्यांनी अनेक भाविक भक्तांना धर्म आचरण बाबत जागृत करुन मोलाचे मार्गदर्शन केले आहे. श्रमण संघास त्यांचे अनमोल मार्गदर्शन नेहमीच मिळते याबद्दल त्यांना श्रमण संघीय युवाचार्य ही पदवी देण्यात आली असून त्यांचे लाखो भाविक भक्त आहेत. पूज्य महाराज साहेबांचा जीवन परिचय प्रेरणादायक आहे. धर्म आराधना कशी असावी, ध्यान साधना कशी करावी, जीवन कसे जगावे याबाबत स्वाध्याय करुन त्यांनी आपले संयमी जीवन सार्थ केले आहे. धर्मप्रेमी श्रद्धाशील श्रावक श्राविकांना या संतवृंदांचे बहुमूल्य मार्गदर्शनाचा लाभ होणार आहे.



ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावर आधारित कीर्तन सेवा झाली. याप्रसंगी प्रवीण बजाज, मिलिंद गंधे, अविनाश बापर्डीकर, शिवांजली अकोलकर, शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावर आधारित कीर्तन सेवा

नगर – ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यांसाठी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या जीवनावर आधारित बाल कीर्तनकार हरिभक्त परायण लक्ष्मी प्रसाद पटवारी यांचे नारदीय कीर्तन झाले. महाराजांनी आपल्या कीर्तनरुपी सेवेत समर्थ रामदास स्वामी यांची आदर्श सुपुत्र कसा असावा याविषयी छत्रपती शिवाजी महाराज यांची स्वराज्य प्रति असलेले निष्ठा आदर्श सुपुत्राची शिकवण या विषयाचा दृष्टांत दिला.

तसेच झाशीची राणी लक्ष्मीबाई यांची शौर्य आणि पराक्रमाची गाथा, मातृभूमीसाठी त्यांनी दिलेलं बलिदान, स्वातंत्र्य लढ्यातील झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी केलेला त्याग आणि समर्पण, विद्यार्थ्यांसमोर हुबेहूब मांडला.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर करावा देशातील नागरिकांचा आदर करावा आणि या स्वातंत्र्य सेनानी सारखे आपले योगदान द्यावे. असे प्रबोधन महाराजांनी केले. हार्मोनियम साथ खरवंडीकर सर यांनी तर तबलावादक शाळीग्राम मुळे यांनी दिली.

या कीर्तनरुपी सेवेसाठी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, खजिनदार अविनाश बापर्डीकर, मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर, सर्व शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

# खेळात भाग घेतल्याने शरीर निरोगी आणि मन सक्रिय होते

### हसीब शेख यांचे प्रतिपादन; मातोश्री उर्दू हायस्कुल व अल्हाज अ.अजीज उर्दू ज्युनियर कॉलेजच्या क्रीडा स्पर्धा

नगर – खेळातून आपल्या शरीरात चपळता निर्माण होते आणि दूरदृष्टी विकसित होते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी खेळात सहभागी व्हावे. खेळात भाग घेतल्याने शरीर निरोगी आणि मन सक्रिय होते, असे प्रतिपादन अलफलाह एज्युकेशन अँण्ड वेल्फेअर सोसायटीचे सदस्य हसीब शेख यांनी केले.

आलमगीर येथील अलफ्लाह एज्युकेशन अँण्ड वेलफेअर सोसायटी अहमदनगर संचलित मातोश्री उर्दू हायस्कुल व अजीज उर्दू ज्युनिअर कॉलेज येथे संस्थेचे सभासद शेख हसीब यांच्या हस्ते क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.



मातोश्री उर्दू हायस्कुल व अल्हाज अ.अजीज उर्दू ज्युनियर कॉलेजच्या क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेमध्ये ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेमध्ये डॉजबॉल, थ्रोबॉल, धावणे, गोळाफेक, थाळीफेक, लिंबू चमचा आदी स्पर्धा घेण्यात आल्या.

स्पर्धेतील विजय विद्यार्थ्यांना संस्थेचे सभासद शेख मेहनाज सलाम व शेख हाजी अजीज रहेमान जनाब यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शेख जमीरअहमद इस्माईल, शेख एजाज अ. कुदडूस, शेख मुजम्मील हाफिज, खान सफिया सलीम शेख, अंजुम सत्तार, खान निशात सोहिल, शेख आफ्रीन शफिउद्दीन, तांबोळी नसरीन मुबीन तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रा.वसुधा देशपांडे यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्रदान

नगर – आहिल्यानगर येथील रहिवासी प्रा. सौ. वसुधा ज्ञानेश देशपांडे यांना त्यांच्या 'पहिलीच कामिनी: एक गूढ रहस्य' या रहस्यमय कादंबरीसाठी नवोदित लेखिका म्हणून नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था (संघ) यांच्या तर्फे राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला आहे. यावेळी दिनकर शिलेदार, संपादक डॉ. भारती चव्हाण, गुणवंत कामगार मंडळाच्या अध्यक्षा अजित चव्हाण भाजप प्रवक्ते आणि सावजी सर यांची विशेष उपस्थिती होती. पुरस्काराचे वितरण पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे ५ जानेवारीला नाशिक येथे झाला.



प्रा. सौ. वसुधा देशपांडे यांना त्यांच्या 'पहिलीच कामिनी : एक गूढ रहस्य' या रहस्यमय कादंबरीसाठी नवोदित लेखिका म्हणून नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था (संघ) यांच्या तर्फे राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला आहे.

आपल्या पहिल्याच कादंबरीची दखल घेत राष्ट्रीय स्तरावरच्या या विशेष पुरस्कारासाठी आपली निवड केल्याबद्दल प्रा.सौ. देशपांडे यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे आणि संपूर्ण टीमचे आभार मानले आहेत.

# चेक अनादरपोटी कर्जदाराला ६५ हजार रु. दंड व एक महिना कारावास

नगर – श्री लक्ष्मी महिला पतसंस्था, अ.नगर या संस्थेकडून कर्जदार राकेश दत्तात्रय कोमाकुल यांनी व्यवसायापोटी २२/१/२२ कर्ज रु.७५००० घेतले आणि मुदतीत दरमहा कर्ज हप्ता भरला नाही. त्यामुळे थकबाकी रक्कम वाढत गेली. सरतेशेवटी कर्जदाराने थकबाकी पोटी रु.५४००० रकमेचा चेक २३/१/२३ रोजी दिला.

संस्थेने सदर चेक बँकेत भरले असता पुरेसा निधि खात्यात नसल्या कारणाने सदर चेक अनादरीत झाला. त्यामुळे पतसंस्थेने कर्जदाराविरुध्द निगो. इन्सु. ॲक्ट कलम १३८ नुसार न्यायालयात दावा दाखल केला. याबाबत न्यायलय क्र.७ चे अति. मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांपुढे सुनावणी होऊन कर्जदार राकेश कोमाकुल यांना चेक अनादर पोटी रु. ६५००० नुकसान भरपाई देण्याचा तथा १ महिन्याचा सक्षम कारावासाची शिक्षा देण्यात आली.

पतसंस्थेच्या वतीने सुहास मोहोरकर यांनी माहितीगार इसम म्हणून काम केले ॲड. राजू गाली यांनी न्यायालयात संस्थेची बाजू मांडली.

# इंजिनियरने केली ऑफिसमधून लॅपटॉपची चोरी; गुन्हा दाखल

नगर – इंजिनियरने वॉचमन कडून ऑफिसची चावी घेऊन ऑफिस उघडून आतील २० हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेल्याची घटना प्रोफेसर चौक येथील स्वामी ट्रॅव्हल्स मॅनेजमेंट बिझनेस सेंटर ऑफिसमध्ये घडली. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात सोमवारी (दि.६) सायंकाळी त्या इंजिनिअरवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची माहिती अशी की सावेडी परिसरातील प्रोफेसर चौक येथील स्वामी ट्रॅव्हल मॅनेजमेंट, बिझनेस सेंटरमधील २० हजार रुपये किमतीचा लॅपटॉप २२ डिसेंबर रोजी चोरीला गेला होता. या संदर्भात ऑफिसच्या सीसीटीव्ही फूटेजची पाहणी केली असता त्यामध्ये ऑफिसमध्ये काम करणारे इंजिनियर वैभव नंदकुमार उदावंत (रा. आदर्श कॉलनी बोल्हेगाव) यांनी वॉचमन कडून चावी घेऊन ऑफिस उघडून चोरून नेला असल्याचे समोर आले.

याप्रकरणी या कार्यालयात काम करणारे गणेश दिलीप जगताप (रा. वांबोरी, ता. राहुरी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी उदावंत विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०६ नुसार गुन्हा दाखल केला आहे.



के.जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट २.० संपर्क अभियान' राबविण्यात आले.

# के.जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात 'स्कूल कनेक्ट २.० संपर्क अभियान'

नगर – के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात स्कूल कनेक्ट २.० संपर्क अभियान अंतर्गत पंडित नेहरू हिंदी विद्यालयातील ९ वी, १० वीच्या विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी विद्यार्थ्यांना वस्तूंच्या उगमापासून त्या विक्रीस जाईपर्यंत त्यांना कोणत्या प्रक्रियेतून जावे लागते व त्या प्रक्रियांदरम्यान असणाऱ्या व्यावसायिक संधींविषयी मार्गदर्शन केले. तर महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने उच्च शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या नवीन विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत व्यावसायिक संधींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी पंडित नेहरू हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक धिवर सर, कविता शर्मा मॅडम, भोसले मॅडम, परदेशी सर उपस्थित होते तर महाविद्यालयातील प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. सविता चव्हाण, सौ. अमृता मुळे, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते

# ज्येष्ठ नागरिकांसाठी सुसज्ज सभागृह बांधून देणार

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; स्टेशन परिसर संघाच्यावतीने सन्मान, सुगम संगीत कार्यक्रमाने नववर्षाचे जल्लोषात स्वागत

नगर – ज्येष्ठांच्या आशीर्वादामुळे नगरकरांचे असलेले अतूट नाते, शहराचा विकास यामुळे पुन्हा सेवा करण्याची संधी मिळाली आहे. निश्चितच या संधीचे सोने अहिल्यानगरच्या विकास कामाच्या माध्यमातून करून दाखवू. ज्येष्ठ नागरिक संघाच्या ज्या अडचणी आहेत त्या सोडवण्याचा प्रयत्न करू. ज्येष्ठ नागरिकांचे काम कौतुकास्पद आहे याचा निश्चितच फायदा होईल. ज्येष्ठ नागरिक संघासाठी लवकरच सुसज्ज असे सभागृह बांधून देऊन त्यांची सभागृहाची असलेली मागणी पूर्ण करणार असल्याचे आमदार संग्राम जगताप म्हणाले.




आ. संग्राम जगताप यांचा ज्येष्ठ नागरिक संघ स्टेशन परिसर यांच्या वतीने अध्यक्ष के.डी. खानदेशे, ॲड. विजय लुणे, अशोक आगरकर, शिवाजीराव ससे, दत्तात्रेय फुलसौंदर यांनी सन्मान केला (छाया – समीर मन्यार)

नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत आमदार संग्राम जगताप निवडून आल्याबद्दल त्यांचा स्टेशन परिसर ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने अध्यक्ष के.डी. खानदेशे, ॲड. विजय लुणे, अशोक आगरकर, शिवाजीराव ससे, दत्तात्रेय फुलसौंदर यांनी सन्मान केला. यावेळी डीसीबी बँकेचे शाखा अधिकारी भुसे, विकास मुळे, दत्तात्रय जाधव, दीपक खैरे, प्रशांत गायकवाड, अनिल शिंदे, विजय गव्हाणे आदीं उपस्थित होते.

यावेळी डीसीबी बँक यांच्या सौजन्याने वीरंगुळा मैदान येथे नववर्षानिमित्त जय मातादी ग्रुप यांचा सुगम संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कुमारी दिशा हिच्या गणेश वंदना नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये अमोल शिंगी, राजेंद्र फिरोदिया, किशोर बोरा, निहावस्तवाल या गायकांनी हिंदी मराठी येथे सादर करून कार्यक्रमाला रंगत आणली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जुबेर भाई यांनी केले.

जय मातादी ग्रुपचे सर्व गायक कलाकार हे आपले व्यवसाय सांभाळून सेवाभावी वृत्तीने कार्यक्रम सादर करतात असे संघाचे अध्यक्ष केडी खानदेशे यांनी सांगितले.

राजेंद्र फिरोदिया यांनी जय मातादी ग्रुपच्या वतीने ज्येष्ठ नागरिक संघास रुपये १५०० देणगी दिली. यावेळी डीसीबी बँकेचे शाखाधिकारी भुसे यांचा सन्मान संघाचे अध्यक्ष केडी खानदेशे यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक आगरकर यांनी केले तर दत्तात्रेय फुलसौंदर यांनी आभार मानले.

# प्राणी, पक्षी आणि मानवासाठी चायना मांजा यमदूतासारखा

### डॉ. श्रीमती मंगला भोसले यांची माहिती; सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी 'करू सण आनंदाने साजरा' उपक्रम



चायना मांजा किती भयंकर आहे, त्याचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावे म्हणून नुकताच हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी करू सण आनंदाने साजरा हा कार्यक्रम चेअरमन अजित बोरा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. याप्रसंगी पक्षीमित्र तुषार लहारे यांच्यासह विद्यालयातील शिक्षक आदी.

नगर – कधीही विघटन न होणारा हा परदेशी मांजा म्हणजे प्राणी, पक्षी आणि मानवासाठी शापच आहे. मांज्याचे दुष्परिणाम सांगत पतंग उडविण्यासाठी वापरला जाणारा हा मांजा पतंग उडविणार्याला देखील त्रासदायक आहे. अनेकांचे हात, डोळे, कान असे अवयव या मांजाने कापले असून संक्रांती सारख्या आनंदी उत्सवात अशा त्रासदायक वस्तूचा समावेश नसावा हे आवर्जून विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

चायना मांजा किती भयंकर आहे.. त्याचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावे म्हणून नुकताच हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी करू सण आनंदाने साजरा हा कार्यक्रम चेअरमन अजित बोरा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. याप्रसंगी पक्षीमित्र तुषार लहारे उपस्थित होते.

याप्रसंगी लहारे यांनी झाडावर लटकलेले मृत पक्षी, अपंग प्राणी यांचे केवळ अशा प्लास्टिक पासून बनवलेल्या चायना मांजा मुळे भयंकर अपघात होतात. रस्त्यावर गाडीवर जाणाऱ्या व्यक्तीचे हात, गळा या मांजाने चिरलेला आम्ही प्रत्यक्ष पाहिला आहे. कधीही भरून न येणारे नुकसान अशा मानजांमुळे होतो. म्हणून या संक्रांतीला आपण हा मांजा न वापरण्याची शपथ घेऊया. मांजा विकणारा, साठविणारा आणि वाहून नेणारा देखील अपराधीच आहे. आपल्याकडे मांजा सापडल्यास मोठ्या पोलीस कारवाईला सामोरे जावे लागेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतः हा चायना मांजा न वापरता इतरांना देखील वापरण्यापासून रोखावे. ही पक्षीमित्र संघटनेच्या वतीने या ठिकाणी विनंती करीत आहे. असे सांगत चायना मांजामुळे झालेल्या अनेक भयंकर अपघाताची उदाहरणे सांगितली.

कलाशिक्षक अशोक डोळसे यांनी आपण खाऊन टाकली चिंगम पक्षांच्या चोचीत अडकते आणि ती उपाशी मरतात त्यामुळे चिंगम सारखा पदार्थ न खाता पक्षी मित्र बनावे हे आवर्जून सांगितले.

याप्रसंगी पर्यवेक्षक गोविंद धर्माधिकारी क्रीडाशिक्षक सुनील कुलकर्णी, नितीन केने सौ. योजना वाघमारे, सौ. शितल शिंदे, सौ. वैशाली पिसे, सौ. वृशाली जोशी, आनंद जोशी व विद्यार्थी, पालक उपस्थित होते. आभार व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती क्रांती मुंदनकर मॅडम यांनी मांडले.



कवयित्री सरोज आल्हाट यांचा नाशिकमध्ये साहित्य सेवा व प्रबोधन पुरस्काराने गौरव करण्यात आला.

## कवयित्री सरोज आल्हाट यांचा नाशिकमध्ये साहित्य सेवा व प्रबोधन पुरस्काराने गौरव

नगर – येथील कवयित्री सरोज आल्हाट यांना सामाजिक व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल नाशिक येथील भावना बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने राज्यस्तरीय साहित्य सेवा व प्रबोधन पुरस्काराने गौरविण्यात आले. नाशिक येथील टिळक रोड, औरंगाबादकर सभागृहात झालेल्या राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार २०२४–२५ प्रदान सोहळ्यात आमदार राहुल ढिकले यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी

ॲड. नितीन ठाकरे, माजी शिक्षक आमदार नानासाहेब बोरस्ते, ज्येष्ठ लेखक डॉ. बापूराव देसाई, सहसचिव मु. न. शेट्टीवार, रमेश चौधरी, ज्येष्ठ पत्रकार श्रीकांत बेणी, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शिवाजीराव शिरसाठ, संस्थेचे सचिव महेश मुळे, अध्यक्ष भरत देवरे, भाऊसाहेब बावा आदी उपस्थित होते.

सरोज आल्हाट यांच्या नुकतेच प्रकाशित झालेल्या मराठी मधील अनन्यता व इंग्रजीतील इंप्रिंट्स ऑफ नेचर अॅण्ड माय सोल या काव्य संग्रहाचे उपस्थित पाहुण्यांची विशेष कौतुक करुन त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## 'राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४' नगर येथील ॲड. संदीप पाखरे यांना प्रदान



नगर – सामाजिक राजकीय धार्मिक अध्यात्मिक आणि व्यावसायिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा यथोचित गौरव व्हावा या दृष्टीने युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांच्यावतीने दरवर्षी दिला जाणारा राज्यस्तरीय २०२४ महाराष्ट्र गौरव पुरस्कार ॲड. संदीप दादासाहेब पाखरे यांना सन्मानपत्र, ट्रॉफी, मेडल देऊन नुकताच प्रदान करण्यात आला आहे. व्यावसायिक क्षेत्राबरोबर सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

वकील बंधू भगिनींच्या अडचणींसाठी आणि प्रश्नांसाठी ॲड. संदीप पाखरे हे सतत कार्यरत असतात. ॲड. संदीप पाखरे हे अहमदनगर जिल्हा न्यायालयात वकिली व्यवसाय करत आहेत. ॲड. पाखरे हे नोटरी पब्लिक भारत सरकार असून अहमदनगर लॉयर्स ऑप सोसायटीचे संचालक देखील आहेत. वकिली व्यवसायात समवेत पाखरे हे सामाजिक कार्यात देखील अग्रभागी असतात कोविड–१९ च्या आपत्ती जनक परिस्थितीत अनेक गरजू व्यक्ती आणि रुग्णांना ॲड. संदीप पाखरे यांनी ब्लड प्लाज्मा हॉस्पिटल जेवण इत्यादी बाबतीत मोठ्या प्रमाणावर निस्वार्थीपणे मदत केलेली होती. अंध अपंग निराधार वृद्ध व्यक्तींकरिता ॲड. पाखरे नेहमीच मदत करतात.

त्यांच्या निस्वार्थीपणे करत असलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन युवा महाराष्ट्र फाउंडेशन यांनी सन २०२४ चा महाराष्ट्र गौरव पुरस्कार ॲड. संदीप पाखरे यांना जाहीर करून प्रदान केलेला आहे.

## सरस्वती नाईट हायस्कूलमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्नसंचाचे मोफत वाटप



सरस्वती नाईट हायस्कूलमधील दहावीच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्नसंचाचे मोफत वाटप करण्यात आले.

नगर – नवविद्या प्रसारक मंडळाच्या सरस्वती मंदिर नाईट हायस्कूलमधील इयत्ता १० वी बोर्डाच्या परीक्षेतील सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मुंबईच्या मासूम संस्थेमार्फत नवनीत २१ अपेक्षितचे प्रश्नसंचाचे मोफत वाटप करण्यात आले. दिवसा अर्थाजन करुन रात्री शिक्षण घेणाऱ्या शहरातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

अपेक्षित प्रश्नसंचाचे वाटप कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक पांडुरंग गवळी, सहशिक्षक विलास शिंदे, देवका लबडे, विना कुऱ्हाडे, सुषमा धारूरकर, मासूम संस्थेचे शिक्षक प्रतिनिधी महेंद्र म्हसे आदींसह आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व रात्रशाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्याध्यापक पांडुरंग गवळी म्हणाले की, मासूम संस्थेच्या माध्यमातून रात्र शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी विविध उपक्रमातून प्रोत्साहन देण्याचे कार्य सुरु आहे. संस्थेच्या योगदानाने व शिक्षकांच्या परिश्रमाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता देखील वाढली असल्याचे स्पष्ट करुन, रात्रशाळेत विविध सोयी–सुविधा मिळताना त्याचा योग्य उपयोग करुन जीवनाचे ध्येय गाठण्याचे त्यांनी आवाहन केले.

मासूम संस्थेचे शिक्षक प्रतिनिधी महेंद्र म्हसे यांनी रात्री शिक्षण घेणाऱ्या इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांना नवनीत २१ अपेक्षित उपयोगी पडत असल्याचे सांगितले. या उपक्रमास मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर, संचालक कमलाकर माने व युवराज बोऱ्हाडे वरिष्ठ व्यवस्थापक गुरुप्रसाद पाटील, एस.एस.सी. विभाग प्रमुख शशिकांत गवस, निलेश ठोंबरे व रात्रशाळेत वर्षभर राबविल्या जाणाऱ्या उपक्रमास बजाज फिनसर्व्ह कंपनीचे सहकार्य मिळत आहे त्याबद्दल संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

## विद्यार्थ्यांनी वेगळे अस्तित्व निर्माण करून करिअर घडवण्यासाठी पुस्तक वाचनावर भर द्यायला हवा

### प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांचे प्रतिपादन; अहमदनगर महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पुस्तकांचे सामूहिक वाचन



वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत ग्रंथालय, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, करिअर कट्टा, मराठी विभाग, हिंदी विभाग आणि इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पुस्तकांचा सामूहिक वाचन आयोजन करण्यात आले होते.

नगर – आजच्या धावपळीच्या जीवनात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण वाचनाकडे पाठ फिरवू लागले आहेत. त्यात आजचे युग हे स्पर्धेचे आणि संगणकाचेदेखील मानले जाते. आजची युवा पिढी तर मोबाईलमुळे (भ्रमणध्वणी) वेगळ्याच विश्वात अडकली आहे. आज या सर्वांना म ोबाइल, संगणक, लॅपटॉपसारख्या उपकरणांमुळे व्हॉट्सअॅप, फेसबुक, यूट्यूब, इन्स्टाग्राम इत्यादीचे जणू व्यसनच लागले आहे. आज विद्यार्थ्यांना आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्यासाठी, आपले करिअर घडवण्यासाठी पुस्तक वाचनावर भर द्यायला हवा, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांनी केले.

वाचन संस्कृतीचा विकास व्हावा, तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, समाजप्रबोधन करणे, तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करणे हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत ग्रंथालय, विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना, करिअर कट्टा, मराठी विभाग, हिंदी विभाग आणि इंग्रजी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अहमदनगर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पुस्तकांचा सामूहिक वाचन आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस बोलत होते.

ग्रंथ प्रदर्शन व वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य आर.जे. बार्नबस यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पुस्तकांचे सामूहिक वाचन या स्पर्धेत महाविद्यालयातील असंख्य विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी महाविद्यालयातील ग्रंथालयात व ग्रंथालय परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये, विद्यार्थी व लेखक साहित्यिक यांच्यामध्ये वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन, विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पुस्तकांचे सामूहिक वाचन यासारख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी उपप्राचार्य प्रा.दिलीपकुमार भालसिंग, विनाअनुदान विभाग प्रमुख प्रा. डॉ. सय्यद रज्जाक, उपप्राचार्य डॉ. नोएल पारगे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार पिटर चक्रनारायण यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रंथालयातील कर्मचारी जॉय भांबळ, अमोल लोंढे, सौ. शिल्पा खिल्लारी, आकाश देवरे, आणि सौ. सोनाली कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी संगणक विभागातील विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. प्रशांत फुगनर, कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. भागवत परकाळ यांनी केले. तर सहा. ग्रंथपाल विकास बांगर यांनी आभार मानले.



जामगाव सेवा सोसायटीच्या नविन इमारतीचा भूमीपूजन सोहळा झाला.

## जामगाव सेवा सोसायटीच्या नविन इमारतीचा भूमीपूजन सोहळा

नगर – पारनेर तालुक्यातील जामगाव येथील सेवा सहकारी सोसायटीच्या नविन इमारतीचा भूमीपूजन सोहळा २ जानेवारी रोजी सकाळी झाला. अनेक वर्षांपसून प्रलंबित व सभासदांच्या प्रतिक्षेत असणाऱ्या नवीन इमारतीचे स्वप्न साकार होणार आहे. संस्थेचे विद्यमान चेअरमन व संचालक मंडळानी अश्वाशीत केल्या प्रमाणे येत्या वर्षभरात भव्य दिव्य स्वरूपाची दुमजली इमारत तयार होणार असुन, यामुळे ऐतीहासीक जामगावच्या वैभवात भर पडणार आहे, अशी माहीती संस्थेचे विद्यमान चेअरमन नवनाथ बांगर यांनी दिली.

या भूमीपूजन सोहळ्यासाठी गावातील जेष्ठ व संस्थेचे माजी चेअरमन आंबादास केदार, एकनाथ धुरपते, बाळासाहेब सोबले, गणेश बर्वे, जिल्हा बँकेचे शाखाधिकारी पांडुरंग खोडदे, दत्तात्रय धुरपते, सुधाकर शिंदे, मिनिनाथ शिंदे, जगन्नाथ भुजबळ, किसन भुजबळ, हरीदास पवार, रामदास घोडे, ह.भ.प.योगेश शिंदे, निलेश औटी, दिपक खळदकर, बाबाजी बांगर, तुषार बांगर, पांडुरंग हिलाळ, उल्हास मांढरे, प्रसाद सांगळे, हरी कदम, सिताराम खोडाळ, अशोक सोनवणे, नाना फंड, साहेबराव तागड यांसह संस्थेचे विद्यमान चेअरमन नवनाथ बांगर, व्हा.चेअरमन विष्णु नाईक, सचिव विनायक रोहोकले व संचालक कुंडलीक बर्वे, रावसाहेब सोबले, दिलीप सोबले, बंडु औटी, त्रिंबक पवार, संजय शिंदे, नारायण मुंजाळ, दत्तात्रय घोडे, दिलीप शिंदे, सौ.सुनिता नाईक, सौ. लताबाई घोडे आदि उपस्थित होते.

## राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी नगर येथील प्रणिता तरोटे व आप्पा लाढाणे पंचपदी नियुक्त



नगर – स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित शालेय राष्ट्रीय योगासन स्पर्धा २०२४–२५ साठी शहरातील श्रीरामावतार मानधना चारिटेबल ट्रस्ट संचलित महावीर मल्लखांब अॅण्ड योगा ट्रेनिंग सेंटरच्या प्रशिक्षिका आणि राष्ट्रीय पंच प्रणिता राजेंद्र तरोटे आणि आप्पा लाढाणे यांची पंच म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शालेय राष्ट्रीय योगासन स्पर्धा १४ ते १८ जानेवारी दरम्यान कोल्हापूर येथील एबीपी शिक्षण समुह, नवे पारगाव (ता. हातकणंगले) येथे होणार आहे. या स्पर्धेसाठी तरोटे आणि लाढाणे पंच म्हणून काम पाहणार आहे. प्रणिता तरोटे आणि आप्पा लाढणे हे योगासनान आणि मल्लखांबचे राष्ट्रीय खेळाडू असून, आजपर्यंत अनेक राष्ट्रीय स्पर्धांमध्ये त्यांनी पंच आणि प्रशिक्षक पदाची जबाबदारी उत्कृष्टरित्या सांभळली आहे.

सध्या ते नगर शहरामध्ये शालेय विद्यार्थ्यांना मल्लखांब, योगा आणि एरियल सिल्क या खेळाचे प्रशिक्षण देत आहे.



ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा मेळाव्याचे उद्घाटन करताना जालिंदर डोंगरे आदी.

## खेळातून करिअर घडवण्याचा प्रयत्न करावा

### मुख्याध्यापक संजय कानडे यांचे प्रतिपादन; ज्ञानसरिता विद्यालयात क्रीडा मेळाव्याचे आयोजन

नगर – विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून मैदानी खेळाच्या माध्यमातून स्वतःचा विकास साधावा खेळातून करिअर घडवण्याचा प्रयत्न करावा असे प्रतिपादन ज्ञानसरिता विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय कानडे यांनी केले.

येथील ज्ञानसरिता माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा मेळाव्याचे उद्घाटन ज्ञानसरिता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जालिंदर डोंगरे यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आले. सर्वप्रथम आठवी अ विरुद्ध आठवी ब यांच्यातील खो–खो स्पर्धेने क्रीडा मेळाव्याची सुरुवात झाली. खोखो, कबड्डी या सांघिक तर वैयक्तिक लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, रनिंग या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यावेळी अटीतटीचे, चुरशीचे सामने पहायला मिळाले. फनीगेम सह अनेक स्पर्धांचे आयोजन तीन दिवस केले जाणार आहे. यावेळी संजय कानडे, क्रीडा मार्गदर्शक बाळासाहेब शिंदे, शिक्षक सोमनाथ सुंबे, धनगर बी. व्ही., गायकवाड डीव्ही, गुंड शोभा अकोलकर डी.डी., सतीश सातपुते, राजापुरे वंदना, सुरेखा घोलप, वैभव लांडगे, सोनाली शहापूरकर, गुंजकर सर, इंदूमती ढेपे, मनीषा भालेराव आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटना नागपूरच्या कार्याध्यक्षपदी विजयराव पोकळे



नगर – महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण विभागाच्या जो पोलीस विभागास सहकार्य करन्याचे काम करतो त्याचप्रमाणे शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा तसेच परिवहन नियमांचे मार्गदर्शन करतो त्या विभागाच्या महाराष्ट्र राज्य वाहतुक सुरक्षा दल व नागरी संरक्षण संघटन नागपूर अंतर्गत अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्षपदी रेसिडेन्शिअल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार पोकळे सर यांची यांची निवड करण्यात आली.

निवडीचे पत्र विभागिय समादेशक सिकंदर शेख यांनी दिले. त्याप्रसंगी जिल्हा समादेशक सोमनाथ बोंतले, राज्य अध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन, राज्य महासमादेशक अनिल शेजाळे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा वाहतूक सुरक्षा दल व नागरी संरक्षण विभागाच्या सर्व सदस्यांच्या वतीने तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे



# ट्री ऑफ ४० फ्रूट्स

*बीज तसं फळ , असा आजवरचा विचार आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' असं संतमहात्म्यही सांगून गेले आहेत. मात्र अलिकडेच न्यूयॉर्कमधील सॅम वॅन अकेन नामक संशोधकाने वेगवेगळ्या ४० प्रकारची फळं लगडतील असं एक झाडं लावलं आहे. मुख्य म्हणजे अनोख्या पद्धतीने कलम तयार करण्याचा त्याचा हा प्रयोग १०० टक्के यशस्वी झाला असून या एकाच झाडाला वेगवेगळ्या ४० प्रकारची फळं लगडली आहेत. म्हणजेच हे झाड सफरचंद, आंबा, संत्री, मोसंबी, चिक्कू, चेरी आदी फळांच्या भाराने वाकलं आहे. 'ट्री ऑफ ४० फ्रुट्स' असं त्याचं नामकरण झालं असून सध्या ते अनेकांच्या औत्सुक्याचा विषय ठरतंय.*

# फोटोशूटसाठी अविवाहित मुली प्रेग्नंट!

जगात कधी काय ट्रेंड निघेल काही सांगता येत नाही. आजकाल इतक्या गोष्टी आपल्या आजुबाजूला घडत असतात, की त्या पचवनही कठीण जाते. असाच एक ट्रेंड सध्या सुरू आहे, ज्याच्याबद्दल वाचून नक्कीच धक्का बसतो. असा ट्रेंड पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. फक्त फोटोशूटसाठी अविवाहित मुली प्रेग्नेंट होऊ लागल्या आहेत. होय, कोणत्याही रिलेशनशिप अन् लग्नाशिवायच या मुली प्रेग्नेंट होऊन फोटोशूट करत आहे. हा विचित्र ट्रेंड चीनमध्ये सुरू आहे.



चीन देशातील हा विचार करायला लावणारा ट्रेंड सुरू झाला आहे, जो पचनी पडणे खरच कठीण आहे. चीनमधील काही मुली अविवाहित असतानादेखील प्रेग्नेंट राहून फोटोशूट करताना दिसत आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या या फोटोशूटची जोरदार चर्चा सुरू आहे; पण याचा त्या मुलींवर काहीही परिणाम होताना दिसत नाही.

एका अहवालानुसार, 'सोशल मीडिया'वर काही तरुणी आणि अविवाहित मुली प्रेग्नेंट होऊन फोटोशूट करताना दिसत आहेत. या मॅटर्निटी फोटोशूटमध्ये या मुली 'प्रेग्नेंट' होत नसून बनावट बेबी बंप लावून फोटोशूट करत आहेत. जेन-झींचा हा नवा ट्रेंड पाहून चीनमधील पालकांनादेखील मोठा धक्का बसला आहे. चीनमधील मुलींच्या या फोटोशूटच्या मागे मुलींचा असा तर्क आहे, की त्या अजून काही दिवस लग्न करणार नाहीत; पण त्यांना त्यांच्या प्रेग्नेंसी फोटोशूटमध्ये स्लिम आणि सुंदर दिसायचे आहे. जर या मुली ३० व्या वर्षी प्रेग्नेंट राहिल्या, तर त्यांच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडतील; पण २६ व्या वर्षी जर त्यांनी हे फोटोशूट केले, तर त्या आहे तशा तरुण दिसतील.

या विचाराने चीनमधील मुली आधीच त्यांचे फोटोशूट करून घेत आहेत. त्यानंतर जेव्हा त्या प्रेग्नेंट होतील, तेव्हा हेच फोटो त्या शेअर करतील. सोशल मीडियावर नेटकऱ्यांनी या ट्रेंडला प्रचंड ट्रोल केले आहे.

# कॅलिडोस्कोप

# चार कोटींचे घर, तरीही बेघर!

प्रत्येकाला आपल्या हक्काचे घर असावे असे वाटते. मनासारख्या ठिकाणी, मनाप्रमाणे घर असावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. त्यामुळे घर घेण्यासाठी लोक आपल्या आयुष्याची पुंजी खर्च करतात. एवढा पैसा खर्च करून घराच्या चाव्या हातात येतात, तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार उरत नाही; पण चार कोटींचे घर खरेदी करूनही बेघर असाल तर? धक्का बसला ना? एका दाम्पत्याबाबत असेच काही घडले. चार कोटींचे घर घेतल्यानंतरही हे जोडपे बेघर झाले.


ब्रिटनमध्ये राहण्याऱ्या एका जोडप्याने घरासाठी आपली आयुष्यभराची पुंजी खर्च केली. आपल्या स्वप्नातील घर मिळाल्याने त्यांच्या आनंदाला उधाण आले होते. त्यांना आता कधी आपण नव्या घरात शिफ्ट होतो असे झाले होतं. त्यानुसार ते शिफ्टही झाले; पण शिफ्ट झाल्यावर त्यांना भयंकर पश्चात्ताप झाला. आपले पैसे पाण्यात गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. असे कधी होईल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते.



वॉल्टर ब्राऊन आणि त्याची पत्नी शेरॉन यांनी हे घर विकत घेतले होते; पण घर पाहिल्यावरच त्यांना हे घर सोडून जावे लागले. ते म्हणाले, घरात गेल्यावर खिडकी उघडताच आम्हाला समोर कचऱ्याचा प्रचंड ढीग दिसला. घर खरेदी करताना आम्ही कचऱ्याचा ढिग पाहिला होता. याबाबत आम्ही डेव्हलपर्सकडे तक्रार केली होती. त्या वेळी तुम्ही हे घर खरेदी करा. पेमेंट मिळाल्यावर हा कचरा हटवण्याची जबाबदारी माझी राहील असे तो म्हणाला. पण कचऱ्याचा ढिग आहे तसाच आहे. एवढ्या रकमेत या परिसरात घर मिळणे कठीण आहे. एवढेच नव्हे, तर त्या परिसरात साधा पक्का रस्ताही नाही. कच्चे रस्ते आहेत, तरीही आम्ही कमी पैशात मिळते, म्हणून घेतले आणि आमची फसवणूक झाली, असे या जोडप्याचे म्हणणे आहे.

# जिद्दीच्या बळावर...

वयाच्या ७१ व्या वर्षी बहुसंख्य लोक आराम करत असतात. निवृत्तीनंतर आपल्या आवडीनिवडी जपत असतात. कोणी वाचन करतं, कोणी भटकंती करतं. कोणाला इतर काही छंद असतात. पण या वयात बॉडिबिल्डिंगचा विचार कोणीच करत नाही. उतारवयात शरीर साथ देत नसताना शरीरसौष्ठवाकडे कोण वळणार? मात्र सध्या ८२ वर्षांच्या असणाऱ्या अर्नेस्टाइन शेफर्ड यांनी वयाच्या ७१ व्या बॉडीबिल्डिंग सुरू केलं. त्यांच्यात तरुणांनाही लाजवेल असा उत्साह आहे. अकरा वर्षांच्या असताना एका अपघातात त्यांच्या गुडघ्याला दुखापत झाली होती. गुडघ्याचं हाड मोडलं. ते नंतर नीट जुळलंच नाही. यामुळे त्यांचा एक पाय थोडा अधू राहिला. डॉक्टरांनी त्यांना फारसा व्यायाम न करण्याचा सल्ला दिला होता. पण त्यांनी कोणाचं काहीच ऐकलं नाही. ७१ व्या वर्षी त्यांशी भरपूर व्यायाम करून शरीर सुडौल बनवलं आणि बॉडीबिल्डिंगच्या विश्वात प्रवेश केला. पन्नाशीपर्यंत त्या गृहिणीच होत्या. एके दिवशी कुटुंबासोबत फिरायला गेल्या असताना त्यांच्या पतीने त्यांना स्वीमसूट




घालायला सांगितला. त्यावेळी त्यांच्यासोबत असणाऱ्या शेफर्ड यांच्या बहिणीनेही स्वीमसूट घातला. या दोघी एकमेकींकडे पाहून हसू लागल्या. त्या खूपच बेढब दिसत होत्या. मग त्यांनी व्यायाम करण्याचा निर्णय घेतला. मधल्या काळात शेफर्ड यांच्या बहिणीचं निधन झालं. मात्र त्या मागे हटल्या नाहीत. ७१ व्या वर्षी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सरावाला सुरूवात केली. सात महिने सराव केल्यानंतर पहिल्या बॉडीबिल्डिंग स्पर्धेत सहभागी व्हायला त्या तयार झाल्या. पहिलीच स्पर्धा त्यांनी जिंकली. आता त्या प्रौढ महिलांना बॉडीबिल्डिंगचं प्रशिक्षण देतात.

# मांसभक्षक रोपटी

काही झाडं मांसभक्षक असतात. कॅनडातल्या शास्त्रज्ञांनी देशातल्या दुर्गम भागात अशा रोपट्याचा शोध लावला आहे. हे रोपटं पालीसारख्या दिसणाऱ्या सॅलामेंडर नावाच्या प्राण्याला खातं. इथल्या अॅल्गॉनकुइन पार्कमध्ये हे रोपटं सापडलं आहे. या पार्कमध्ये विविध प्रजातींची रोपटी आणि प्राणी आहेत. गेल्या दोन वर्षांपासून या परिसरात संशोधन सुरू आहे. युनिव्हर्सिटी ऑफ गुएल्फचे शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत. त्यांनी कॅनडामध्ये १४४ मांसभक्षी रोपटी पाहिली आहेत. अशाप्रकारे मांसभक्षी रोपट्यांची आजवर कल्पनाच केली गेली होती. मात्र आता अशी रोपटी जगासमोर आली आहेत. पिटफॉला ट्रॅप या नावानेही हे रोपटं ओळखलं जातं. संशोधकांच्या टिमने ऑगस्ट आणि सप्टेंबर २०१८ मध्ये अशा ५८ रोपट्यांचा शोध लावला यातल्या २० टक्के रोपट्यांच्या आत सॅलामेंडरची पिल्लं अडकली होती. काही रोपट्यांमध्ये एकापेक्षा अधिक सॅलामेंडर होते. काही सॅलामेंडर जिवंत होते तर काहींचा तीन दिवसातच मृत्यू झाला होता. नायट्रोजन मिळवण्यासाठी ही रोपटी मांसभक्षक बनली असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.





# फी नको, प्लास्टिक बाटल्या द्या

सध्या सगळीकडेच प्लास्टिकमुक्तीसाठी योजना राबवल्या जात आहेत. प्लास्टिकचा कचरा कमी करण्यासाठी बऱ्याच कल्पना लढवल्या जात आहेत. याचाच एक भाग म्हणून नायजेरियातल्या एका शाळेने मुलांकडून फी म्हणून प्लास्टिक बाटल्या घ्यायला सुरूवात केली. त्यामुळे मुलांना दप्तरासोबतच प्लास्टिक बाटल्यांनी भरलेली पिशवीही न्यावी लागते. या बाटल्यांचं वजन केल्यानंतर मिळणारी किंमत त्यांच्या एकूण फीमधून वजा केली जाते. या उपक्रमामुळे कुटुंबावरचा आर्थिक बोजा कमी झाला शिवाय देशही प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने वाटचाल करू लागला. आफ्रिकन क्लीन अप मोहिमेअंतर्गत हा उपक्रम राबवण्यात येत असून रिसायकलिंग करणाऱ्या संस्थांचं सहकार्यही यासाठी घेतलं जात आहे. इथल्या मॉरिट इंटरनॅशनल स्कूलने यासाठी पुढाकार घेतला आहे. इतर काही शाळांमध्येही अशाप्रकारे प्लास्टिक बाटल्या स्वीकारल्या जातील. आर्थिक बोजा कमी झाल्यामुळे पालकही खूश आहेत. मुलांनाही आता शिक्षण अर्धवट सोडावं लागणार नाही. म्हणजेच एकाच योजनेमुळे दोन लाभ झाले आहेत.

# स्मार्टफोन ठेवा बाजूला!

स्मार्टफोनच्या वाढत्या वापरामुळे लोकांमधला परस्पर संवाद कमी होत चालला आहे. जेवणाच्या टेबलवरही लोक मोबाईलशीच खेळत असतात. कोणी चॅट करत असतं तर कोणी व्हिडिओ बघत असतं. यामुळे कुटुंब, मित्रमैत्रिणी यांच्यातला संवाद कमी होत चालला आहे आणि विसंवाद वाढत चालला आहे. याबद्दल बरीच ओरड होत असली तरी लोक मोबाईलचा वापर करत रहातात. अमेरिकेतल्या एक पिझ्झा रेस्टॉरंटने यावर एक नामी उपाय शोधून काढला आहे. इथे येणाऱ्या ग्राहकांनी आपला फोन लॉकरमध्ये जमा करायचा आणि मोफत पिझ्झा खायचा अशी ही ऑफर आहे. कंपनी एक पिझ्झा मोफत देते. लोकांमधला संवाद वाढणं गरजेचं असल्यामुळे आम्ही हा उपक्रम सुरू केल्याचं रेस्टॉरंट व्यवस्थापनाचं म्हणणं आहे. काही काळ तरी लोकांनी मोबाईलपासून दूर रहायला हवं. यासाठी त्यांना थोडी प्रलोभनं दाखवणं गरजेचं आहे. या रेस्टॉरंटमध्ये आलेल्या मोठ्या गटाला ही सवलत मिळते. या गटातल्या प्रत्येकाने आपला मोबाईल लॉकरमध्ये जमा करायचा असतो. साधारण तीन आठवड्यांपूर्वी हा उपक्रम सुरू झाला. त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. लोकांनी मोबाईल न वापरण्याची सवय कायम ठेवावी, असं कंपनीचं म्हणणं आहे. खरं तर मोबाईलचा वापर कमी करायचा असं प्रत्येकाने ठरवायला हवं. मात्र त्यासाठी अशी प्रलोभनं दाखवण्याची वेळ येणं ही धोक्याची घंटा म्हणायला हवी.



# कारवाई कंपनीच्या अंगलट

कंपनीने केलेली कारवाई त्याला महागात पडली. मेट्रो वेबसाइटच्या रिपोर्टनुसार, १८ वर्षांची मुलगी एलिझाबेथ बेनासी एका ब्रिटिश कंपनीत नव्याने भरती झाली होती आणि तिने तिथे मेहनतीने काम केले; मात्र तीन महिन्यांनंतर तिच्यासोबत असे काही घडले, की कंपनीने तिला नोकरीवरून काढून टाकले आणि त्यावर तिने स्पोर्टस्? शूज घालून ऑफिसमध्ये आल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे तिच्यावर ही कारवाई करण्यात आली.


मुलीला कंपनीचा हा निर्णय मान्य नव्हता. त्यानंतर तिने याबाबत न्यायालयात धाव घेतली. न्यायालयात एलिझाबेथ या मुलीने न्यायाधीशांना सांगितले, की लोक स्पोर्टस्? शूज घालून ऑफिसमध्ये जात नाहीत, हे मला माहीत नव्हते. तथापि, माझ्या या चुकीबद्दल माझ्या बॉसने मला फटकारले आणि माझ्याशी असे वागले. जणू काही मी नोकरदार नसून लहान मुलगी आहे. याशिवाय न्यायाधीशांसमोर जबाब देताना तरुणीने तिथे काम करणारे लोक मला अनेकदा टार्गेट करत असतात, असे सांगितले. तिच्या वयामुळे आपल्याला पीडित बनवले जात असल्याच्या कारणावरुन त्याने कंपनीवर दावा दाखल केला; मात्र त्याची कामगिरी चांगली नसल्यामुळे त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याचे कंपनीने न्यायालयात आपले म्हणणे मांडले. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायाधीशांनी मुलीच्या बाजूने निकाल दिला. कंपनीने आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना समान वागणूक द्यायला हवी, इतर कर्मचारीही स्पोर्टस्? शूज घालून कार्यालयात येत असताना मग एलिझाबेथला तशीच वागणूक का नाही, असे न्यायालयाने विचारले. या प्रकरणात एलिझाबेथला ३२ लाख रुपयांची भरपाई द्यावी, असे आदेश न्यायालयाने दिले.



# हिवाळ्यात पाऊस का पडतो?

दिल्ली-एनसीआरसह देशातील अनेक भागात पाऊस पडत आहे. पावसामुळे थंडी आणखी वाढली आहे. हवामान खात्याने पावसासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

साधारणत: उन्हाळ्यात वाढत्या तापमानात वाढत्या आर्द्रतेमुळे पावसाळी परिस्थिती निर्माण होते; पण डिसेंबर महिन्यात पाऊस का पडतो, असा प्रश्न पडतो. हिवाळ्यातही पाऊस पडतो; पण तो फारच कमी असतो. यामागेही एक कारण आहे. हिवाळ्यात पडणाऱ्या पावसाला जबाबदार कोण, या पावसाचा फायदा कोणाला होणार आणि कोणाचे नुकसान होणार हे जाणून घेऊया. हिवाळ्यात पाऊस पडण्याचे कारण म्हणजे वेस्टर्न डिस्टर्बन्स. भूमध्य प्रदेशात कमी दाबाचे वादळ निर्माण होते. त्याचे वारे उत्तर-पश्चिम दिशेला जातात आणि वातावरणासोबत पाऊस आणि बर्फवृष्टी निर्माण करणारी परिस्थिती निर्माण होते. धुके वाढते. धुके आणि हिमवर्षाव होतो; परंतु दरवर्षी पाऊस पडतोच असे नाही.



हिवाळ्यात पडणाऱ्या पावसाचा थेट परिणाम तापमानावर होतो. हिमालयीन प्रदेशातून येणाऱ्या थंड हवेमुळे मैदानी भागात तापमान आणखी घसरते. अशा प्रकारे तापमान घसरल्याने थंडी वाढते. साधारणपणे हिवाळ्यात कोरडेपणा असतो; पण पाऊस पडल्यानंतर आर्द्रतेचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडी आणखी वाढते. यामुळेच अशा हवामानात अधिक सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

या पावसाचा थेट फायदा रब्बी पिकांना होतो. रब्बी पिकासाठी पाऊस अत्यावश्यक मानला जातो. यामुळे शेतात ओलावा टिकून राहतो. पावसामुळे पोषक द्रव्ये जमिनीत विरघळतात, जी झाडांपर्यंत पोचतात; मात्र मर्यादित प्रमाणात पाऊस पडल्यासच फायदा होतो. पावसामुळे जड कण कमी होतात आणि हवेची गुणवत्ता सुधारते. पावसाळ्यानंतर नद्या आणि तलावांची पाणी पातळी हळूहळू कमी होत जाते. हिवाळ्यात पावसाचे फायद्यांसोबतच काही तोटेही आहेत. विशेषतः डोंगराळ भागात पावसामुळे भूस्खलनाचा धोका वाढतो. वाहतुकीचा वेग मंदावतो. दळणवळणात अडथळे निर्माण होतात हिवाळ्यातील पावसामुळे हवेतील आर्द्रता वाढते, ज्यामुळे धुके अधिक दाट होऊ शकते.

# उंदरांसाठी बांधलं घर

आजच्या युगात प्रत्येक जण स्वत:च्या स्वार्थाचा विचार करतो. या पृथ्वीवर रहाणाऱ्या इतर जीवजंतूंबाबत फारसा विचार केला जात नाही. या पृथ्वीतलावरचे अनेक जीव आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. झाडं तोडली जात आहेत. मात्र अशा परिस्थितीतही काही लोक धीर सोडायला तयार नाहीत. ही मोजकी मंडळी पर्यावरण वाचवण्यासाठी झटत असतात. इतरांनाही आधार देतात. ब्रिटनमधला प्रसिद्ध वाईल्ड लाईफ फोटोग्राफर सायमन अशाच काही लोकांपैकी एक. त्यांनी आपल्या घराच्या बागेत उंदरांसाठी घर तयार के लं आहे. इथे राहणाऱ्या उंदरांना ते फळं आणि इतर खाद्यपदार्थ देतात. एके दिवशी बागेत काम करत असताना डेल यांना उंदिर दिसला. तेवढ्यात एक मांजर आलं. हे मांजर उंदराकडे बघत होतं. मांजर उंदराची शिकार करणार असल्याचं बघून त्यांनी घरातून एक बॉक्स आणला आणि उंदरासाठी घर तयार केलं. डेल यांनी उंदराचं नाव जॉर्ज ठेवलं. हा जॉर्ज या घरात रहायला आला. त्यानंतर इतर काही उंदिर रहायला आले. त्यांचं कुटुंब वाढत गेलं. मग डेल यांनी अजून खोल्या तयार केल्या. या खोल्या आतून एकमेकांशी जोडलेल्या आहेत. आता इथे भरपूर उंदिर आहेत. उंदरांचं गावच इथे वसलं आहे.



